नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com








* वर्ष ५२ * अंक १९६ * | * अकोला * | रविवार, दिनांक १८ जानेवारी २०२६ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


## थोडक्यात...

### तृणमुल घुसखोरांना मतदार बनवत आहे..

■ **कोलकाता :** पश्चिम बंगालमधील मालदा येथे मोदींनी शनिवारी सांगितले की, घुसखोरी हे बंगालसमोरील एक मोठे आव्हान आहे. बंगालच्या अनेक भागात लोकसंख्येचे संतुलन बिघडत आहे. तृणमूल काँग्रेस घुसखोरांना मतदारांमध्ये रूपांतरित करत आहे. गरिबांचे हक्क हिरावले जात आहेत. भाजप सरकार स्थापन होताच घुसखोरांवर कारवाई केली जाईल.



आयुष्मान भारत योजनेवर बोलताना पंतप्रधान म्हणाले की, तृणमूल काँग्रेसला तुमच्या दुःखाची चिंता नाही. आयुष्मान योजना येथे लागू केलेली नाही. अशा दगडी मनाच्या सरकारला बंगालमधून काढून टाकले पाहिजे.

### दोन रशियन महिलांची गोव्यात निर्घृण हत्या

■ **पणजी :** गोव्यात दोन रशियन महिलांच्या हत्येचे प्रकरण समोर आले आहे. पोलिसांनी दोघांच्या हत्येच्या आरोपाखाली ३७ वर्षीय रशियन नागरिकाला अटक केली आहे. आरोपीची ओळख अलेक्सी लिओनोव्ह अशी झाली आहे.
मृत महिलांची नावे एलेना कस्थानोवा (३७) आणि एलिना वानीवा (३७) अशी होती. दोन्ही महिलांची हत्या एकाच पद्धतीने करण्यात आली होती. दोघींचा चाकूने गळा चिरण्यात आला होता. हात शरीराच्या मागे दोरीने बांधलेले होते. आरोपी आणि कस्थानोवा यांची दुसरी महिला मैत्रीण होती.

अटल सेतूवरील पथकर सवलत : १९०१ पदांच्या आकृतीबंधास मान्यता : मुंबईत पोलिसांसाठी ४५ हजार निवासस्थाने

# फडणवीस सरकारचे मोठे निर्णय

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेण्यात आले.

अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या १९०१ पदांच्या आकृतीबंधास मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून, या संचालनालयाचे नाव आता अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयह्नअसे करण्यात येणार आहे.

जिल्हा नियोजन समित्या, सहआयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, मानव विकास कार्यक्रम, वैधानिक विकास मंडळ, तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रम तसेच नक्षलवाद विशेष कृती आराखडा कक्ष यांच्यासाठी आवश्यक अधिकारी आणि कर्मचा?यांचा सुधारित आकृतीबंध मंजूर करण्यात आला आहे. यामुळे नियोजन विभागाच्या कार्यक्षमतेत वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**अटल सेतूवरील पथकर सवलत वाढवली**

नगरविकास विभागाशी संबंधित काही महत्त्वाचे निर्णयही या बैठकीत घेण्यात आले. अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा अटल सेतूवरील पथकर सवलत आणखी एक वर्ष वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे वाहनधारकांना दिलासा मिळणार आहे.

तसेच मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा २ साठी सुधारित खर्चास आणि शासनाचा हिस्सा उचलण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी देण्यात आली. तिरूपती देवस्थानास पद्मावती देवी मंदिरासाठी उलवे येथील दिलेल्या भूखंडाचे शुल्क माफ करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

याशिवाय, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळास पनवेल (पश्चिम) येथील भूखंड देण्यास मान्यता देण्यात आली असून, तेथे मुख्यालय आणि बहुउद्देशीय इमारत उभारली जाणार आहे.



**पुणे महानगर परिवहन महामंडळासाठी एक हजार ई-बस**

शहरी वाहतूक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांवरही सरकारने भर दिला आहे. पीएम-ई ड्राईव्ह योजनेंतर्गत पुणे महानगर परिवहन महामंडळासाठी एक हजार ई-बससाठी निधी वळता करण्याच्या थेट प्रणालीस मान्यता देण्यात आली आहे.

पेमेंट सिक्युरिटी मेकॅनिझम अंतर्गत पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या खात्यातून डायरेक्ट डेबिट मॅन्डेटद्वारे संबंधित कंपन्यांना थेट देयके अदा केली जाणार आहेत. यामुळे सार्वजनिक वाहतूक सक्षम व पर्यावरणपूरक होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

**मल्टी-मॉडेल हब आणि टर्मिनल मार्केट उभारण्यास मंजुरी**

ग्रामीण आणि कृषी क्षेत्रालाही मंत्रिमंडळाने प्राधान्य दिले. भाजीपाला निर्यातीसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे बापगाव (ता. भिवंडी) येथे सर्वोपयोगी मल्टी-मॉडेल हब आणि टर्मिनल मार्केट उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी राज्य कृषी पणन महामंडळाला ७ हेक्टर ९६.८० आर जमीन उपलब्ध करून दिली जाणार आहे.

दुसरीकडे, यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा नदी प्रकल्पासाठी ४७७५ कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली असून, या प्रकल्पामुळे पाच तालुक्यांतील ५२ हजार ४२३ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. अमरावती जिल्ह्यातील मौजा धामकच्या पुनर्वसनाचा प्रश्नही मार्गी लावण्यात आला आहे.

### मुंबई पोलिस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पास मंजुरी




गृह आणि कौशल्य विकास क्षेत्रातही मोठे निर्णय घेण्यात आले. मुंबईतील पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी ४५ हजार शासकीय निवासस्थाने उभारण्याच्या मुंबई पोलिस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्पास मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे मुंबई शहर व उपनगरातील पोलीस कर्मचाऱ्यांचा निवासाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटणार आहे. तसेच राज्यातील युवकांना परदेशात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतीशीलता आणि क्षमता संस्था म्हणजेच महिमा स्थापन करण्यास हिरवा कंदील देण्यात आला आहे. ही संस्था प्रशिक्षित आणि कुशल युवकांना जागतिक रोजगार बाजाराशी जोडण्याचं महत्त्वाचं काम करेल.

राज्याचे दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, हे या कॅबिनेट बैठकीला गैरहजर राहिले. विशेष म्हणजे, दोघेही राज्यातच उपस्थित असतानाही त्यांनी बैठकीस हजेरी लावली नाही. एकनाथ शिंदे मुंबईत तर अजित पवार पुण्यात असतानाही कॅबिनेटला दांडी मारल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. महापालिका निवडणुकांच्या निकालानंतर निर्माण झालेली अस्वस्थता आणि नाराजी याचं प्रतिबिंब थेट प्रशासनावर पडतंय का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### अंतर्गत तणाव उघड की तात्पुरती नाराजी?

एकूणच, एकीकडे कॅबिनेट बैठकीत घेतलेले व्यापक आणि दूरगामी निर्णय सरकारची प्रशासनिक गती दर्शवतात, तर दुसरीकडे उपमुख्यमंत्र्यांची गैरहजेरी आणि निवडणूक निकालानंतर सुरु असलेली अस्वस्थता राज्याच्या राजकारणात नवे प्रश्न उभे करत आहे. महायुतीतील अंतर्गत तणाव उघड होतो आहे का, की ही केवळ तात्पुरती नाराजी आहे, याकडे लक्ष लागलं आहे.

सनी चव्हाण हत्याकांड

# ४ मारेकऱ्यांना जन्मठेप

न्यायालयाने प्रत्येकी ५ लाखांचा दंडही सुनावला

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :**
एमआयडीसीच्या राजीवनगर परिसरातील सनी चव्हाण हत्याकांडातील ४ आरोपींना विशेष मकोका न्यायालयाचे न्यायाधीश आर. एम. सदराणी यांनी दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा सुनावली, तर एकाची गुन्हा सिद्ध न झाल्याने निर्दोष सुटका केली.

दोषींना प्रत्येकी ५ लाख रुपयांचा आर्थिक दंडही सुनावण्यात आला. दंडाची रक्कम भरली नाही तर त्यांना अतिरिक्त कारावास भोगावा लागेल. रियाज मोहम्मद मोफील वकील शेख (२९) रा. राजीवनगर, अजय काशीनाथ विरगडे (२०) रा. बहुजननगर, वाघधरा, रोहित ऊर्फ टोनी श्रावण श्रीरामे (२९) रा. वानाडोंगरी आणि पवन अशोक वैद्य (२७) रा. बहुजननगर, राजीवनगर अशी दोषींची नावे आहेत.

१ जुलै २०२१ रोजी रात्री ८.२५ च्या सुमारास एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील राजीवनगर, मेश्राम गल्ली येथे ही घटना घडली होती. पोलिसांनी सनीची आई शारदा विजयसिंग चव्हाण यांच्या तक्रारीवरून ५ आरोपींविरुद्ध खून आणि मकोका अंतर्गत गुन्हा नोंदविला होता. आरोपी आणि मृतक सनी विजयसिंग चव्हाण (१६) यांच्यात जुने वैमनस्य होते. याच वैमनस्यातून आरोपींनी सनीला कायमचे संपवण्याचा कट रचला.

रात्रीचे जेवण करून सनी घराबाहेर पडला. मेश्राम गल्लीत आरोपींनी सनीला घेरत त्याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात सन्नीचा जागीच मृत्यू झाला होता. तत्कालीन सहाय्यक पोलिस आयुक्त प्रवीण तिजाडे यांनी गुन्ह्याचा तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. सरकारी वकील ॲड. शामसुंदर आरोपींवर वरील चारही आरोपींवर गुन्हा सिद्ध करण्यात यशस्वी झाले.

न्यायालयाने आरोपींनी खून करणे व कट रचने या अंतर्गत आजन्म सश्रम कारावास आणि प्रत्येकी ३ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ६ महिने अतिरिक्त साधी कैद, मकोका अंतर्गत आजन्म सश्रम कारावास आणि प्रत्येकी १ लाख रुपये दंड. दंड न भरल्यास ६ महिने अतिरिक्त कैद, प्रत्येकी ५ वर्षे सश्रम कारावास आणि ५ लाख रुपये दंड आणि दंड न भरल्यास ६ महिने अतिरिक्त साधी कैद, अशी शिक्षा सुनावली.

या खटल्यातील पाचवा आरोपी संदीप कुनीलाल बोपचे याची साक्षी-पुराव्या अभावी न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. पैरवी अधिकारी म्हणून एपीआय हेमंत कोकणी आणि पोलिस हवालदार नितीन सिरसाट यांनी मोलाची भूमिका बजावली.





तुमच्या मार्केट परताव्यामध्ये लाइफ कव्हरचा फायदा

नॉन-पार, लिंक्ड, जीवन, वैयक्तिक, बचत योजना

- ₹2500/- इतक्या कमी मासिक प्रिमियमने सुरूवात करा
- दोन फंडाच्या निवडीचा पर्याय-निफ्टी 50 (फ्लेक्सी स्मार्ट ग्रोथ फंड) किंवा निफ्टी 100 (फ्लेक्सी ग्रोथ फंड) यांच्या निवडक स्टॉक्समधील गुंतवणूकीच्या 100% पर्यंत
- हमीपूर्वक वृध्दीसह*

* अटी आणि शर्ती लागू.

LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत

LIC/P1/2024-25/22/MAR

अधिक माहितीसाठी तुमच्या एजंट/जवळची एलआयसीची शाखा यांच्याशी संपर्क साधा किंवा 56767474 वर तुमच्या शहराचे नाव एसएमएस करा

एलआयसी मोबाईल ॲप डाऊनलोड करा LIC digital | भेट द्या: licindia.in | कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827 | आमचा व्हाट्सॲप नं. 8976862090 बोला 'Hi' | आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512

भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसीजची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियम्सची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत, अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.

लिंक्ड इन्श्युरन्स प्रॉडक्टस् हे परंपरागत इन्श्युरन्स प्रॉडक्टस् पेक्षा वेगळे असतात आणि हे जोखिम घटकांच्या अधीन असतात.
लिंक्ड इन्श्युरन्स पॉलिसीज् मध्ये भरण्यात येणारे प्रिमियम हे बाजारपेठेतील भांडवल आणि जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्याशी संबंधित गुंतवणूकीच्या जोखमींच्या अधीन असतात. फंडाची कामगिरी आणि भांडवली बाजारपेठ/जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्यावर परिणाम करणारे घटक यांच्या आधारे युनिट्सचा एनएव्ही कमी जास्त होऊ शकतो आणि विमाधारक व्यक्ती ही त्याच्या/तिच्या निर्णयासाठी स्वत:च जबाबदार असते.
लाइफ इन्श्युरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया हे केवळ लाइफ इन्श्युरन्स कंपनीचे नाव आहे आणि इंडेक्स प्लस हे केवळ संलग्न इन्श्युरन्स कॉन्ट्रॅक्टचे नाव आहे आणि त्यातून कॉन्ट्रॅक्टची गुणवत्ता, त्याच्या भविष्यातील संभावना किंवा परतावे या गोष्टी कोणत्याही प्रकारे सूचित होत नाहीत.
कृपया तुमचे विमा एजंट किंवा मध्यस्थ किंवा इन्श्युरन्स कंपनीने दिलेले पॉलिसी डॉक्युमेन्ट यांच्यामधून संबंधित जोखमी आणि लागू होणारे भार यांची माहिती घ्या.
या कॉन्ट्रॅक्ट अंतर्गत देऊ करण्यात येणारे वेगवेगळे फंड्स ही फक्त फंडांची नावे आहेत आणि ती कोणत्याही प्रकारे या प्लॅन्सची गुणवत्ता, त्यांच्या भविष्यकाळातील संभावना आणि परतावे सूचित करीत नाहीत.






- बँकेच्या अधिकृत अधिकाऱ्यासोबत रिअल-टाइम व्हिडिओ संवाद (व्हिडिओ KYC) द्वारे बँक खाते उघडा किंवा KYC अपडेट करा.
- व्हिडिओ KYC वापरून, बँक ग्राहकाची ओळख पडताळेल.
- आवश्यक असलेली प्रमुख कागदपत्रे: CKYC आयडेंटिफायर **किंवा** आधार **किंवा** DigiLocker मधील ओळखपत्रे आणि PAN.
- तुमच्या बँकेच्या वेळेनुसार व्हिडिओ KYC उपलब्ध आहे.

अधिक माहितीसाठी,
https://rbikehtahai.rbi.org.in/VKYC वर जा
अधिकृत व्हॉट्सॲप नंबर्स:
99990 41935/99309 91935

सार्वजनिक हितार्थ जारी
भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

# मुंबई जिंकली, पण महापौर कोण?

## भाजप-शिंदे सेनेत पडद्यामागे जोरदार हालचाली : जानेवारीअखेर महापौर निवड : सत्ता स्थापन होणार कशी?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :
मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल शुक्रवारी जाहीर होताच राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली. २५ वर्षांपासून शिवसेना आणि ठाकरे गटाच्या ताब्यात असलेली बृहन्मुंबई महानगरपालिका अखेर भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या युतीकडे गेली.


या निवडणुकीत भाजपने ८९ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष होण्याचा मान पटकावला. यामुळे मुंबईच्या सत्ताकेंद्रात पहिल्यांदाच भाजपचा झेंडा फडकणार हे स्पष्ट झालं असलं, तरी आता सर्वाधिक उत्सुकता आहे ती मुंबईचा महापौर नेमका कोण होणार, याची.

निवडणुकीपूर्वीच मुंबईच्या महापौरपदावरून वातावरण तापलं होतं. ठाकरे बंधूंनी जाहीरपणे मुंबईचा महापौर मराठीच असेल, अशी भूमिका घेतली होती. याच पार्श्वभूमीवर सुरुवातीला भाजपकडून महापौर हिंदू असेल, अशी भूमिका मांडली गेली होती.

मात्र प्रचाराच्या उत्तरार्धात वाढता वाद पाहता भाजपलाही मुंबईचा महापौर मराठी व्यक्तीच होईल, असं स्पष्ट करावं लागलं. आता भाजपने निवडणूक जिंकल्यानंतर या भूमिकेची अंमलबजावणी कशी होते, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

माहितीनुसार, मुंबईच्या महापौरपदाचा निर्णय तात्काळ होणार नाही. जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत महापौर निवडीची प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता आहे. पुढील आठवड्यात नगरविकास खात्याकडून महापौर पदासाठी सोडत काढली जाणार असून, या सोडतीनंतर साधारण दहा दिवसांनी महापौराची अधिकृत निवड होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे तोपर्यंत मुंबईच्या महापौरपदावर सस्पेन्स कायम राहणार आहे.

संख्याबळाचा विचार केला तर भाजपने ८९ आणि शिंदे सेनेने २९ जागा जिंकल्या आहेत. मुंबई महानगरपालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी किमान ११४ जागांची आवश्यकता आहे. भाजप एकट्याला हा बहुमताचा आकडा गाठता येत



नसल्यामुळे शिंदे गटाची साथ अपरिहार्य ठरणार आहे.

यामुळेच महापौरपदावर भाजपचा नैसर्गिक दावा असला, तरी शिंदे सेनेचे काही नेतेही महापौरपदासाठी आग्रही असल्याची चर्चा आहे. सत्तास्थापन करताना महापौरपदावरून दोन्ही पक्षांमध्ये रस्सीखेच होणार का, याकडे राजकीय वर्तुळाचं लक्ष आहे.

या निवडणुकीत मुंबईतील मतदारवगाचं चित्रही वेगळं पाहायला मिळालं. मराठीबहुल भागांमध्ये ठाकरे बंधूंच्या आघाडीला तुलनेने यश मिळालं, तर अमराठी लोकसंख्या असलेल्या भागांमध्ये भाजपने मोठी मुसंडी मारली.

अमराठी मतदारांनी भाजपला एकगठ्ठा मतदान करत त्यांच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. मुंबई हे आंतरराष्ट्रीय आणि कॉस्मोपॉलिटन शहर असल्यामुळे, अमराठी व्यक्ती महापौर झाल्यास त्यात गैर काय? असा युक्तिवादही पुढे येत आहे. त्यामुळे भाजप खरंच अमराठी व्यक्तीला महापौरपदी संधी देणार का, हा प्रश्नही चर्चेत आहे.

### महापौर कोण? राज्यासाठी उत्सुकतेचा विषय

दरम्यान, भाजपमध्येच महापौरपदासाठी अनेक इच्छुक नगरसेवक रिंगणात असल्याचं बोललं जात आहे. पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरून कोणाच्या नावावर शिक्कामोर्तब होतं, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. दुसरीकडे, शिंदे गट महापौरपदासाठी कितपत ताणून धरेल, यावर सत्तास्थापनेचं गणित ठरणार आहे. २५ वर्षांनंतर मुंबईच्या सत्तेत झालेल्या या मोठ्या बदलानंतर आता महापौर कोण होणार, हा प्रश्न मुंबईकरांसह संपूर्ण राज्यासाठी उत्सुकतेचा विषय ठरला आहे.

# सुपडा साफ होताच भाजपचा दादांना दुसरा मोठा धक्का

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १७ :
राज्यातील महानगरपालिकांचा निकाल जाहीर झाला असून, भाजपने दणदणीत विजय मिळवला आहे. मुंबई पुण्यासह राज्यातील महत्त्वाच्या महापालिकांवर भाजपचा झेंडा फडकण्याची शक्यता आहे.

या निकालानंतर आता लगेच जिल्हा परिषद निवडणुकांची रणधुमाळी सुरू होणार आहे. काल पासूनच उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये भाजपने अजित पवारांचा गेम केला आहे. या दोन्ही ठिकाणी भाजपचा महापौर बसणार हे जवळपास निश्चित झाले आहे. यानंतर आता भाजपने अजित पवारांना आणखी मोठा धक्का दिला आहे.



महापालिकेच्या निवडणुकीत राज्यात सत्तेत असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीला भाजपने दूर ठेवले होते. अजित पवारांच्या पक्षाने जवळपास सर्वच ठिकाणी स्वतंत्र निवडणूक लढवली होती. मात्र यात राष्ट्रवादीला फारसे यश मिळालेले नाही. त्यानंतर आता आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपने अजित पवारांना धक्का देण्याची तयारी केली आहे. पुण्यातील जिल्हा परिषद निवडणूक भाजपने स्वबळावर लढण्याची भाषा केली आहे.

पुणे जिल्हा परिषद निवडणुकीसाठी भाजपाने स्वबळाचा निर्धार व्यक्त केला आहे. पुणे जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाची महत्त्वाची बैठक मंत्री चंद्रकांतदादा पाटील आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी आगामी निवडणुकीची रणनिती, संघटनात्मक मजबुती तसेच उमेदवार निवडीसंदर्भात सविस्तर व सकारात्मक चर्चा झाली. पुणे जिल्हा परिषदेची निवडणूक भारतीय जनता पक्षाने स्वबळावर लढवावी, असा ठाम व एकमुखी सूर या बैठकीत उमटला.

महापालिकांच्या निवडणुकीमध्ये अजित पवार यांनी महायुतीची साथ सोडून चक्क काका शरद पवार यांचा हात पकडला. मात्र, अजित पवारांच्या पक्षाला अत्यंत मोठा धक्का बसल्याचे बघायला मिळाले.

पिंपरी चिंचवड आणि पुणे महापालिकेत अजित पवारांच्या बालेकिल्ल्याला भाजपाने मोठा सुरूंग लावला. अजित पवारांचे राजकीय वलय पिंपरी चिंचवडसह पुण्यात आहे. निवडणुकीत त्यांना धक्का बसला.

निकालामध्ये पिंपरी चिंचवडकरांनी अजित पवारांना नाकारले. महेश लांडगे यांनी या निवडणुकीत आपली संपूर्ण ताकद लावली आणि भाजपाला मोठा विजय मिळून दिला. या विजयानंतर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, पिंपरी चिंचवडमध्ये जनतेने आम्हाला छप्पर फाड के पाठिंबा दिला, त्यांनी एक प्रकारे अजित पवार यांना डिवचल्याचेही बघायला मिळाले.

# पराभवाने खचायचे नाही...

## अजित पवारांचा कार्यकर्त्यांना सल्ला

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १७ :
सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिका निवडणुकीत मिळालेल्या विजयाबद्दल भाजपचे कौतुक केले आहे. भाजपने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात ही निवडणूक लढली. त्यांना अतिशय चांगले यश मिळाले व इतरांचा पराभव झाला. पराभवाने खचायचे नसते. आपण आपले काम करत राहायचे असते, असे ते म्हणालेत.



महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसची प्रचंड हाराकिरी झाली आहे. राज्यातील २९ महापालिकांत या पक्षाला केवळ १६७ जागांवर समाधान मानावे लागले. विशेषतः पुणे महापालिकेत दोन्ही राष्ट्रवादीची युती असूनही त्यांना केवळ ३० जागांवर समाधान मानावे लागले. पिंपरी चिंचवडमध्येही त्यांना केवळ ३७ जागा मिळाल्या. या पार्श्वभूमीवर अजित पवारांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी भाजपचे कौतुक करत राष्ट्रवादी काँग्रेस भविष्यात अधिक जोमाने काम करेल असे स्पष्ट केले.

अजित पवार म्हणाले, लोकशाहीत मतदार राजा हा फार महत्त्वाचा असतो. प्रयत्न करणे प्रत्येक राजकीय पक्षाचे काम असते. प्रत्येकांनी प्रयत्न केले. पण भाजपला अतिशय चांगले यश मिळाले. या प्रकरणी मी भाजपचे मनापासून अभिनंदन करतो. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भाजपने या सगळ्या निवडणुका लढल्या. त्यांना खूप चांगला प्रतिसाद मिळाला. त्यात इतरांचा पराभव झाला. माझे स्वतःचे गणित असे आहे की, पराभवाने खचून जायचे नसते. पुन्हा आपले काम करत राहायचे असते.

आम्ही बसून कुठे काय झाले? याची माहिती घेऊ. मीडिया सुद्धा म्हणत होता की चांगले वातावरण आहे. आमचे अंदाज चुकले, तसे मीडियाचेही अंदाज चुकले. ठीक आहे. अजित पवार म्हणाले, सध्या निवडणुकीची घाई आहे. ५० टक्के आरक्षणाच्या आत केवळ १२ जिल्हा परिषदा आहेत. तेथील भौगोलिक व राजकीय परिस्थिती पाहून आमचे स्थानिक पदाधिकारी योग्य तो निर्णय घेतील.

# पराभव मान्य, पण माघार नाही..

## राज ठाकरेंचा कार्यकर्त्यांना उपदेश

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
महापालिका निवडणुकांच्या निकालानंतर राजकीय वातावरण तापलेले असतानाच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना संदेश दिला आहे.

मराठी अस्मितेच्या लढ्याचा नवा राजकीय सूर उमटला आहे. ही लढाई सोपी नव्हती. ही लढाई धनशक्ती आणि सत्तेच्या शक्तीविरुद्ध शिवशक्तीची होती, अशा स्पष्ट आणि आक्रमक शब्दांत राज ठाकरेंनी निवडणूक रणधुमाळीचं वास्तव मांडत पराभव मान्य केला असला, तरी माघार मात्र स्पष्टपणे नाकारली आहे.

सत्तेचं प्रचंड बळ, पैशांचा मारा आणि प्रशासनाची ताकद एकाच बाजूला असताना दुसऱ्या बाजूला उभी राहिलेली शिवशक्ती–या असमतोल लढाईतही दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी दिलेली झुंज हीच खरी कमाई असल्याचं त्यांनी ठामपणे नमूद केलं.



अचाट धनशक्तीसमोर उभं राहणं सोपं नव्हतं, पण तरीही आमचे कार्यकर्ते डगमगले नाहीत,ह्व असं सांगताना राज ठाकरेंनी कार्यकर्त्यांच्या जिद्दीचं जाहीर कौतुक केलं. अपेक्षित यश न मिळाल्याचं दुःख त्यांनी शब्दांत मान्य केलं, मात्र ह्खचून जाणं हा आमचा स्वभाव नाही, असा राजकीय इशाराही त्यांनी दिला.

मनसेला मर्यादित यश मिळालं असलं, तरी निवडून आलेले नगरसेवक हे स्थानिक सत्ताधाऱ्यांना पुरून उरतील, असा ठाम विश्वास राज ठाकरेंनी व्यक्त केला. मराठी माणसाच्या विरोधात काही घडलं, तर ते सत्ताधारी असोत वा कोण असो–त्यांना जेरीस आणल्याशिवाय आम्ही राहणार नाही, असेही ते म्हणाले.

# शतकही गाठता आले नाही

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत सत्ताधारी भाजप - शिंदे गटाची सत्ता आल्यानंतर शिवसेनेच्या ठाकरे गटाने या दोन्ही पक्षांवर उपहासात्मक टीका केली आहे.



गावठी चाणक्यांनी एवढ्या सगळ्या स्वायत्त यंत्रणा अधीन ठेवूनही त्यांना मुंबईत साधे शतकही काढता आले नाही, असे ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे. ठाकरे गटाचे केवुळ २०-२५ नगरसेवक होते. आज त्यांचा आकडा ६५ वर पोहोचल्याचे एक वेगळे गणितही त्यांनी या प्रकरणी मांडले आहे.

सुषमा अंधारे आपल्या पोस्टमध्ये भाजप व शिंदे गटाला खोचक टोला हाणताना म्हणाल्या, गावठी चाणक्यांनी एवढ्या सगळ्या स्वायत्त यंत्रणा अधीन ठेवून सुद्धा मुंबईत साधं शतक गाठता आलं नाही. शिवसेनचे २०/२५ नगरसेवक होते. आज ६५ आहेत. मनसेचे ६ नगरसेवक हा फायदा वेगळाच. शाहसेनेचे ५३ नगरसेवक होते. आज २८ आहेत. भाजपाचे ८४ नगरसेवक होते. ते ४ ने वाढले. २७ महापालिका आम्ही जिंकू म्हणणारी भाजपा प्रत्यक्षात फक्त ९ ठिकाणी स्वबळावर तर १५ ठिकाणी कुबड्यावर उभी राहण्याचा प्रयत्न करतेय, अशी टीका त्यांनी केली.

# ...तर भाजपचा महापौर अशक्यच

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
महानगरपालिका निवडणुकांच्या निकालानंतर राज्यातील राजकारण अधिक तापले असून उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी टीका केली. मुंबईत भाजपचा महापौर होण्यामागे शिंदे कारणीभूत असल्याचा आरोप त्यांनी केला.



राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदे शिवसेनेचे जयचंद झाले नसते, तर मुंबई महापालिकेत भाजपचा महापौर कधीच झाला नसता. मराठी जनतेने शिंदेंना इतिहासात जयचंदच्या भूमिकेतच लक्षात ठेवावं लागेल, शिंदेंमुळेच मराठी माणसाची सत्ता मुंबईतून गेली, असा आरोप त्यांनी केला.

# वंचित बहुजन आघाडीची सरस कामगिरी

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १७ :
वंचित बहुजन आघाडी या पक्षाने मनपा निवडणुकीत चांगली कामगिरी केली आहे. या पक्षाचे नांदेड, मुंबई, परभणी, छत्रपती संभाजीनगर या महापालिकांत अनेक उमेदवार निवडून आले आहेत.



नांदेड महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग ७ (ड) मधून वंचितचे प्रशांत इंगोले हे विजयी झाले आहेत. प्रभाग ७ (अ) मधून वंचित बहुजन आघाडीचे राहूल सोनसळे हेदेखील विजयी झाले आहेत.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीत वंचितच्या करुणा मेघानंद जाधव, अफसर खान यासीन खान, अमित भुईगळ यांनी विजय मिळवला आहे.

अकोल्यातही वंचितने दमदार कामगिरी केली असून येथे शेख शमशू कमर शेख साबीर, जयश्री बहादूरकर, उज्वला पातोडे, पराग गवई, निलेश देव यांचा विजय झाला आहे. लातूर महापालिकेत वंचितचे अमोल लांडगे विजयी झाले आहेत.

राज्यात आंबेडकरी विचारांचे अनेक पक्ष असून, रिपब्लीकन पार्टीचे अनेक गट महानगरपालिका निवडणुकीत उतरले होते. त्यात रामदास आठवले, प्रा. जोगेंद्र कवाडे आणि अनेक गटांचा समावेश होता. परंतु, त्यांच्या तुलनेत वंचित बहुजन आघाडीची कामगिरी अत्याधिक सरस ठरली आहे.

# महाराष्ट्रात सर्वाधिक मताधिक्याने राघवेंद्र मानकर विजयी

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १७ :
पुणे महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार राघवेंद्र बाप्पू मानकर यांनी राज्यात सर्वाधिक मताधिक्याने विजय मिळवला आहे. प्रभाग क्रमांक २५-ब मधून निवडून आलेल्या मानकर यांना तब्बल २६ हजार ४९७ मतांचे विक्रमी मताधिक्य मिळाले.

पुण्यासह राज्यातील २८ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल शुक्रवारी जाहीर झाले. या निकालांमध्ये भारतीय जनता पक्षाने राज्यात जोरदार मुसंडी मारल्याचे चित्र दिसले. पुणे महानगरपालिकेत भाजपने १२० हून अधिक जागांवर विजय मिळवला.

मनपात २६,४९७ मतांचे मताधिक्य



प्रभाग क्रमांक २५ मधील चारही जागांवर भाजपचे राघवेंद्र बाप्पू मानकर, स्वरदा बापट, कुणाल टिळक आणि स्वप्नाली पंडित हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. राघवेंद्र मानकर यांनी आपल्या पहिल्याच विजयात पुणे शहरासह संपूर्ण महाराष्ट्रात सर्वाधिक मतांनी निवडून येण्याची कामगिरी केली. त्यांना एकूण ३१ हजार ९८१ मते मिळाली, जे एकूण मतदानाच्या ७९.३४ टक्के आहे.

## शिवसेनेच्या पहिल्या महिला आमदार

# नीला देसाई यांचे निधन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
शिवसेनेच्या राजकीय प्रवासातील एक महत्त्वाचा अध्याय शुक्रवारी रात्री संपुष्टात आला. पक्षाच्या पहिल्या महिला आमदार आणि ज्येष्ठ नेत्या नीला देसाई यांचे निधन झाले.



अचानक आलेल्या तीव्र हृदयविकाराच्या झटक्यामुळे त्यांची प्राणज्योत मालवली. उपचारासाठी त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्याची तयारी सुरू असतानाच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनामुळे शिवसेनेत आणि एकूणच महाराष्ट्राच्या राजकारणात शोककळा पसरली आहे.

नीला देसाई या शिवसेनेच्या जुन्या, निष्ठावंत आणि अभ्यासू नेत्या म्हणून ओळखल्या जात होत्या. ज्या काळात राजकारणात महिलांचा सहभाग अत्यंत मर्यादित होता, त्या काळात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांच्यावर विश्वास टाकत नेतृत्वाची संधी दिली होती. त्या शिवसेनेच्या पहिल्या महिला आमदार ठरल्या आणि पुढे विधान परिषदेच्या सदस्य म्हणूनही त्यांनी प्रभावी भूमिका बजावली.

# ओवेसींनी राज ठाकरेंनाही टाकले मागे

## शहरी राजकारणाला नवे वळण : मनसेपेक्षा एमआयएम जास्त

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
महानगरपालिका निवडणुकांच्या निकालांनी महाराष्ट्राच्या शहरी राजकारणात एक महत्त्वाचा संकेत दिला आहे. राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला अपेक्षित यश न मिळता, असदुद्दीन ओवेसी यांच्या एमआयएमने थेट मनसेपेक्षा अधिक जागा जिंकत आपली ताकद दाखवून दिली आहे. विशेषतः मुंबईत एमआयएमने मनसेला मागे टाकत उपस्थिती ठळक केली असून, हा निकाल ठाकरे विरुद्ध ओवैसी अशी नवी राजकीय तुलना समोर आणणारा ठरला.





सर्वांचे लक्ष लागलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेत भाजप सर्वाधिक जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावं लागलं आहे. मात्र या निकालात सर्वाधिक चर्चेचा मुद्दा ठरला तो म्हणजे एमआयएमची कामगिरी, ज्याने थेट राज ठाकरेंच्या मनसेपेक्षा अधिक जागा जिंकून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

राज्यात भाजपचा बोलबाला असतानाच एमआयएमनेही दमदार कामगिरी करत स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. एमआयएमने राज्यातील विविध महानगरपालिकांमध्ये एकूण ११४ जागांवर विजय मिळवला आहे. पक्षाचे नेते शारिक नक्षबंदी यांनी ही माहिती दिली आहे. मागील निवडणुकांमध्ये अत्यंत कमी फरकाने झालेल्या पराभवामुळे कार्यकर्त्यांनी यावेळी विजयासाठी विशेष मेहनत घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

शहरी मतदारांमध्ये आपली पकड वाढवण्यात पक्ष यशस्वी ठरल्याचं या निकालांतून स्पष्ट झालं एमआयएमच्या यशावर पक्षप्रमुख असदुद्दीन ओवेसी यांचीही प्रतिक्रिया समोर आली आहे. घरोघरी जाऊन केलेला प्रचार आणि मागील निवडणुकांतील अनुभव याचा यावेळी मोठा फायदा झाल्याचं त्यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये एमआयएमने ३३ जागा, मालेगावमध्ये २१, अमरावतीत १५, नांदेडमध्ये १३, धुळ्यात १०, सोलापुरात ८, मुंबईत ६, ठाण्यात ५, नागपूर येथे ६, जळगावमध्ये २,आणि चंद्रपूरमध्ये १ जागा जिंकली आहे. विशेषतः छत्रपती संभाजीनगरमध्ये सुरुवातीला अंतर्गत आव्हानं असतानाही ओवेसींच्या रॅलींनंतर पक्षाने मोठं यश मिळवलं.

बीएमसी निवडणुकीत युती करूनही उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांना फारसा फायदा झाल्याचं चित्र नाही. राज ठाकरेंच्या मनसेला अवघ्या ६ जागा मिळाल्या. मुंबईत एमआयएमने ८ जागा जिंकून मनसेपेक्षा अधिक प्रभाव दाखवून दिला आहे.

## ड्रीम प्रोजेक्टला धारावीचा धक्का! मुख्यमंत्र्यांच्या रोड शोला मतपेटीतून नकार धारावीत भाजपचा झिरो

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १७ :
मुंबई महानगरपालिकेत भाजप-शिवसेनेची सत्ता असली, तरी धारावीकरांनी मात्र भाजपला सपशेल नाकारले, अशी स्पष्ट आणि थेट चपराक या निकालातून बसली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून गाजवलेला धारावी पुनर्विकास प्रकल्पही भाजपच्या गळ्यात हार घालू शकला नाही.

खुद्द मुख्यमंत्री धारावीत येऊन रोड शो करून गेले, मोठ्या घोषणा झाल्या, विकासाची स्वप्ने रंगवली गेली; मात्र प्रत्यक्ष निकालात भाजपचा एकही उमेदवार विजयी होऊ शकला नाही. मतपेटीतून धारावीकरांनी दिलेला हा संदेश अत्यंत ठाम आणि स्पष्ट आहे–आमच्या भविष्याबाबत फक्त घोषणा नकोत, विश्वास हवा.

धारावीतील सातही वॉर्डमध्ये भाजपचा झेंडा फडकवण्याचा आटोकाट प्रयत्न अपयशी ठरला. भाजपचे माजी नगरसेवक रवी राजा, तसेच मंगला गायकवाड आणि नीला सोनवणे यांचा पराभव झाला. या निकालाने भाजपसाठी धारावी ही राजकीयदृष्ट्या अजूनही अवघड गाठ असल्याचं पुन्हा एकदा सिद्ध झालं आहे. याउलट उबाठा गटाने धारावीत चार जागांवर विजय मिळवत धारावीवरील आपलं पारंपरिक वर्चस्व पुन्हा अधोरेखित केलं.

# तुरुंगातील आरोपींचा विजय, गुन्हेगारांना राजकीय मार्ग मोकळा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १७ :
महापालिकेच्या निकालाने कुख्यात गुन्हेगार असलेल्या काही उमेदवारांना राजकारणाचा मार्ग खुला केला. पुण्यात खून प्रकरणी तुरुंगात असलेल्या सोनाली आंदेकर आणि त्यांच्या सासूदेखील विजयी ठरल्या. दुसरीकडे, जालन्यात गौरी लंकेश हत्येतील आरोपी श्रीकांत पांगारकर, सोलापुरात खून प्रकरणी तुरुंगात असलेल्या संशयित शालन शिंदे यांचा विजयसुद्धा राजकारणाला नवी कलाटणी देणारा ठरला आहे.

पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्या गौरी लंकेश यांच्या हत्या प्रकरणी जामिनावर असलेला आरोपी श्रीकांत पांगारकर याने जालना महानगरपालिका निवडणुकीत विजय मिळवला आहे. अपक्ष उमेदवार म्हणून लढताना त्याने भाजपच्या उमेदवाराचा पराभव केला.

पांगारकर याने प्रभाग क्रमांक १३ मधून निवडणूक लढवली होती. त्याला २,६६१ मते मिळाली.

पुण्यातील प्रभाग क्रमांक २३ मधून सोनाली वनराज आंदेकर यांचा दणदणीत विजय झाला. आयुष कोमकर खून प्रकरणात तुरुंगात असताना त्यांनी निवडणूक लढवली होती. तर याच प्रभागात तुरुंगातून निवडणूक लढवणाऱ्या त्यांच्या सासू लक्ष्मी उदयकांत आंदेकर यांचा देखील कमी फरकाने विजय झाला आहे.

मात्र, कारागृहात असलेले बंडू आंदेकर यांचा या निवडणुकीत पराभव झाला आहे. सोनाली वनराज आंदेकर आणि लक्ष्मी आंदेकर यांच्या उमेदवारीभोवती सहानुभूतीची लाट निर्माण झाली होती. त्यामुळेच त्यांचा विजय झाल्याचे मानले जात आहे. ह्यअन्यायाविरुद्ध लढणारी महिलाह्व अशी प्रतिमा मतदारांमध्ये रुजली. त्यांच्या समर्थकांनी प्रभागात घरोघरी जाऊन प्रचार केला.

सोनाली आंदेकर यांनी याच प्रभागातून निवडणूक लढणाऱ्या माजी आमदार रवींद्र धंगेकर यांच्या पत्नी तथा अनुभवी नेत्या प्रतिभा धंगेकर यांचा पराभव केल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे. धंगेकर यांच्या नेतृत्वाखाली त्यांचा विजय निश्चित मानला जात होता.



सोलापूरचा मनसे पदाधिकारी बाळासाहेब सरवदे यांच्या खून प्रकरणी अटकेत असलेल्या प्रभाग २ (क) मधील भाजप उमेदवार शालन शिंदे यांचा ६ हजार मताधिक्यांनी विजय झाला आहे. उमेदवारी माघार घेण्यावरून सरवदे यांची हत्या झाली होती. संशयावरुन शिंदे यांच्यासह १५ जणांना अटक झाली. तेव्हापासून त्या तुरुंगात आहेत.

दुसरीकडे, कुख्यात गुंड गजा मारणे याची पत्नी जयश्री मारणे हिचा देखील निवडणुकीत पराभव झाला. तर सराईत गुन्हेगार बापू नायर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून या निवडणुकीत निवडणूक लढवत होता, त्याचा देखील दारुण पराभव झाला आहे. आरोपींचा विजय हे चिंताजनक चित्र आहे.

महासागर
अकोला
पान ३
●रविवार,दि.१८ जानेवारी २०२६

# भाजपाचे विजयी उमेदवार शरद तुरकरांवर जीवघेणा सल्ला

**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर अकोट फाईल परिसरात तणावपूर्ण घटना घडली आहे. प्रभाग क्रमांक २ ब मधील भारतीय जनता पार्टीचे विजयी उमेदवार शरद तुरकर यांच्यावर अज्ञातांनी जीवघेणा चाकूहल्ला केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. या प्रकरणी भाजपचेच प्रभाग क्रमांक २ ड गटातील पराभूत उमेदवार नितीन राऊत आणि त्यांच्या समर्थकांनी हल्ला केल्याची माहिती पुढे येत



आहे.हल्ल्यानंतर परिसरात मोठ्या प्रमाणात गोंधळ उडाला. काही ठिकाणी वाहनांची तोडफोड करण्यात आल्याने परिस्थिती अधिक चिघळली. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन सौम्य लाठीमार केला व परिस्थिती नियंत्रणात आणली. जखमी शरद तुरकर यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. या घटनेमुळे अकोला शहरात राजकीय वातावरण तापले असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# समाजाभीमुक महाविद्यालयीन विद्यार्थी घडणे काळाची गरज : कुलगुरू

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाला मिळाला राज्यस्तरीय आयोजनाचा बहुमान!

**■अकोला,दि.१७ (प्रतिनिधी)■**

कृत्रिम बुद्धिमत्तेसह इंटरनेट आणि इतर समाज माध्यमाच्या आत्याधिक भडीमारामुळे अलीकडील काळातील युवा पिढी काहीशी अलिप्ततेकडे झुकत असून आत्मनिर्भर राष्ट्राच्या निर्मितीसाठी आता एकात्मिक प्रयत्नांची गरज आधोरेखित झाली असल्याचे सांगत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी युवकांच्या देशातील युवा पिढीने आता अधिक समाजाभीमुख होणे गरजेचे असल्याचे सांगताना ह्या करिता शाळा, महाविद्यालयानी सामाजिक उपक्रमात अधिकाधिक विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्याची गरज प्रतिपादित केली. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या अकोला येथील मुख्यालयी आयोजित 'महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण




शिबिराचे' उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. महामहीम राज्यपाल महोदयांच्या कल्पकतेतून आव्हान सारख्या काळसुसंगत उपक्रमांची मालिका महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम, स्वतःची जबाबदारी, कर्तव्य आदींची जाण अधिक भक्कम करणारी असल्याचे गौरवोदगार काढले व डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाला राज्यस्तरीय आव्हान- चान्सलर्स ब्रिगेड राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिराचे आयोजनाचा बहुमान प्राप्त करून दिल्याबद्दल माननीय राज्यपालांप्रति कृतज्ञता देखिल व्यक्त केली. सकाळी दहा वाजता कृषी महाविद्यालय परिसरातील दीक्षांत सभागृहात संपन्न झालेल्या अतिशय महत्वाकांक्षी राज्यस्तरीय शिबिराचे उदघाटनपर आपले विचार व्यक्त करताना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी यांनी आपला देश हा युवकांचा देश असून स्वयंपूर्ण सशक्त राष्ट्र निर्मितीत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे विशद करताना मैदानी खेळांसह आपत्ती व्यवस्थापनाचे धडे शाळा महाविद्यालयातून मिळणे गरजेचे असल्याचे सांगितले. याच विचारांना पुढे नेत महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील यांनी युवा पिढीला सामाजिक जबाबदारीची अधिक जाण देत समाजाप्रती आपण देणे लागतो.

# जबरदस्ती घरात प्रवेश व मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल

**■मुर्तिजापुर,दि.१७ (प्रतिनिधी)■**

शहरातील राणा ले-आऊट, एम आयडीसी परिसरात घरात घुसून शिवीगाळ, मारहाण व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी मुर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अप. नं. ६५/२०२६ अन्वये कलम २९६, ३३३, ३५१(३), ३२४(४), ११५(२) इछड प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

दि. १६ जानेवारी रोजी सायं. ७ वाजताच्या सुमारास आरोपी सुमीत दयाराम गावंडे (रा. गायत्री नगर, दर्यापूर) याने मोटारसायकलवर येत फिर्यादीच्या घरात जबरदस्ती प्रवेश केला. पत्नीला का पाठवत नाही, असा जाब विचारत अश्लील शिवीगाळ

जबरदस्ती घरात प्रवेश व मारहाण प्रकरणी गुन्हा दाखल

करत फिर्यादी व त्यांच्या मुलीला धमकावले. विटेने मारहाण करून घरातील सामानाचे नुकसान केल्याचा आरोप आहे.या प्रकरणी फिर्यादी गभा नंदा पंजाब तायडे यांच्या जबानीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली दाखल अधिकारी हेडकॉन्स्टेबल अनिल राठोड व तपास अधिकारी हेडकॉन्स्टेबल प्रभाकर नागे हे पुढील तपास करीत आहेत. पोलिसांनी आरोपीविरोधात कडक कारवाईचा इशारा दिला आहे.

# काँग्रेसचे नेते हिदायत पटेल यांना सर्वपक्षीय श्रध्दांजली

**■अडगाव बु.,दि.१७ (प्रतिनिधी)■**

तेल्हारा तालुक्यातील अडगांव बु येथे जातीपातीचा आणि धर्माचा कोणताही भेदभाव न करता सर्वांना सोबत घेऊन चालणारे राजकारणात दबदबा असुन सुद्धा कधी द्वेशाचे राजकारण न करता आयुश्यभर सर्व समाज घटकाला एकत्र बांधण्याचे काम केले असे काग्रजसचे जेष्ठ नेते हिदायत पटेल यांचे निधन धाले असुन त्यांना अडगांव बु सर्व पक्षाच्या व पत्रकार बांधवांच्या वतीने श्रध्दांजली सभा मिरसाहेब हाँल मधे आयोजित केली होती

सभेच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ काँग्रेस नेते मनोहरलाल फाफट होते तर शेतकरी संघटनेचे नेते लक्ष्मीकांत कौठकार, अशोक घाटे, गोपाल कोल्हे, संजय राजनकार, डाँ गुलाम नबी,गजानन आप्पा मुंगसे, माणिकराव घाटे,अ.फरीद गु.आरीफ, असलम उल्ला, नाना बहाकर,नरेंद्र मानकर ,अभिजीत ढगे,राजीक कुरेशी, शे.जमीर, नारायण पत्की , अजगर अली मिरसाहेब, डाँ.पंजाबराव धामोडे, राजु रोहणकार, दिपक रेळे, अफरोज खाँ, आदी गावातील शेकडो नागरीक विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी पत्रकार उपस्थित होते.यावेळी



उपस्थितीतांनी दोन मीनीट मौन पाळुन सामुहीक श्रध्दांजली वाहीली तर मनोहरलाल फाफट यांच्या सह गोपाल कोल्हे, राजीक कुरेशी, डाँ. गुलाम नबी ,नरेंद्र मानकर आदीनी पटेल यांच्या सोबतच्या आठवणीना उजाळा दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक घाटे यांनी केले.

# जितापूर शेतशिवारात झटका मशीन चोरणाऱ्या भुरट्या टोळीची दहशत

**■अकोट,दि.१७ (प्रतिनिधी)■**

अकोट तालुक्यातील सातपुड्यातील ग्राम जितापूर रूपागड, पिंपरी परिसरात शेत शिवारातील झटका मशीनची भुरट्या म्प्द चोरी करणारी टोळी सक्रिय झाल्याने शेतकऱ्यांमध्ये सध्या मोठी दहशत वातावरण निर्माण झाले या भागात मागील वर्षी झटका मशीन चोरीचे सत्र सुरू होते मोठ्या प्रमाणावर बागायती शेती असून पहाडी भागात रात्रीला या परिसरात वन्य प्राण्यांच्या मोठ्या प्रमणात हैदोस वाढला असून शेतीपिकांचे अतोनात नुकसान होत आहे जितापूर येथील शेतकरी भागवत शहादेव मंगळे यांच्या गट नंबर ९९ मधील मंगळवार दि. १३ रात्री अज्ञात व्यक्तीने मीटर पेटीचे कुलूप तोडून झटका मशीन चोरून नेल्याची घटना घडली.

गेल्या महिन्यात पॅक गोठ्यामधील फोर व्हीलर गाडीचे साईड ग्लास व काचा अशा दोन वेळा फोडण्यात आल्या या परिसरातील शेतकऱ्यांनी स्वतः च्या पिकाचे संरक्षण म्हणून शेतात चारही बाजूने तार बांधून त्यावर झटका मशीन लावल्या आहेत. मात्र गेल्या काही दिवसांपासून अज्ञात वोरट्यांकडून शेतातील मीटर पेठ्यांचे कुलूप तोडून ह्या झटका मशीन चोरून सपाटा लावला घटनांमध्ये वाढ झाली आहे. या चोरीच्या घटनांमुळे परिसरातील ६ शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला असून त्यांचे अंदाजे २१००० हजार रु. व स्प्रिंकलर पाईप व नौउजल १५००० हजार रु. व बैलगाडी



साहित्य व स्प्रिंकलर पाईप असे अंदाजी ३५००० हजार रु. आर्थिक नुकसान झाले आहे. व पिकांच्या संरक्षणाचा प्रश्न सुध्दा गंभीर बनला आहे. रात्रीला बिबट्या वाघ यांची दहशत वाढल्यामुळे शेताकडे जाणे सहसा टाळले जात असून मागील वर्षी याच शेत शिवारातील प्रफुल्ल मधुकर मंगळे, विठ्ठल नामदेव बहिरे, योगेश हरिभाऊ मंगळे, रामहरी रमेश मंगळे, करण विलास लबडे, गजानन शिंगणे जीतापूर रुबा गड येथील सूनलाल सोलकर मधुकर सोलकर पोलीस पाटील श्रीराम भारसाकडे या तिन्ही शेतकऱ्यांचे झटका मशीन केबल वॉटर पंप पिंपरी सह शेतकरी बजरंग राजेंद्र मानकर यांच्या शेतातील बैलगाडी व १५ स्प्रिंकलर पाईप शेतातील झटका मशीन चोरीमुळे शेतकऱ्यांना पुन्हा नवीन झटका मशीन आणून बसविण्यासाठी मोठा खर्च करावा लागत असून या वन्य प्राण्यांच्यामुळे पिकांचे नुकसानही होत आहे. या होणाऱ्या चोरीच्या भुरट्या चोरांच्या टोळीचां बंदोबस्त करण्यासाठी हिवरखेड पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली आहे.

या परिसरातील झटका मशीन चोरी करणाऱ्या टोळीला पोलिसांनी रंगेहात पकडून कडक कारवाई करावी शेतकऱ्याला न्याय द्यावा अशी सर्व शेतकरी वर्ग मागणी करत आहे, यावेळी जीतापूर सरपंचपती विठ्ठल मंगळे, तंटामुक्ती अध्यक्ष सचिन मंगळे, ऋषी लोणकर यांची मागणी असून समाजसेवक संजय शेळके यांनी स्वतः या चोरीच्या प्रकरणाला उलगळा बसण्यासाठी ५००१ हजार बक्षीस जाहीर केले आहे त्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल असे आवाहन सुद्धा केले आहे.

## थोडक्यात

### समाजसेवी उमेदवारांना जनतेचा कौल

**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीत ज्या उमेदवारांची नाळ थेट जनतेशी जुळलेली आहे, अशा समाजसेवी उमेदवारांना मतदारांनी भरभरून कौल दिल्याचे पाहायला मिळाले. अशा उमेदवारांना निवडून देताना जनतेने जात, पात, धर्म तसेच राजकीय पक्ष बाजूला ठेवून केवळ त्यांच्या कामावर विश्वास दाखवल्याचे चित्र संपूर्ण शहरात होते. काही समाजसेवी उमेदवार याला अपवाद ठरले असले, तरी निवडणुकीत जय होवो अथवा पराजय, जनतेसोबत सातत्यपूर्ण संपर्क ठेवणे किती महत्त्वाचे आहे, हे या निकालावरून स्पष्ट झाले आहे. अकोला शहरात वंचित बहुजन आघाडीचे निवडून आलेले पराग गवई, निलेश देव, भाजपचे हरीश अलिमचंदानी, गणेश अंधारे, विनोद मापारी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे पंकज गावंडे, अपक्ष आशिष पवित्रकार, भाजपचे रणजीत खेडकर, प्रशांत अवचार, शिवसेना (उबाठा) गटाचे मंगेश काळे, मनोज पाटील यांच्यासह अनेक नावे घेता येतील. या उमेदवारांना किंवा त्यांच्या अर्धांगिनींना जनतेने यावेळी सुद्धा भरघोष मतांनी निवडून दिले आहे. केवळ पक्षाच्या लाटेवर अवलंबून न राहता स्वतःची लोकशक्ती निर्माण करणाऱ्या या नेत्यांनी विजयाचा नवा वस्तुपाठ घालून दिला आहे.

### ग्राहकांच्या हक्काच्या संरक्षणाचे बदलते स्वरुप

**अकोला :** ग्राहकांच्या हक्कांच्या संरक्षणाचे बदलते स्वरुप या विषयावर जनजागृती लोकनाट्य मंडळाद्वारे जनजागृतीपर कार्यक्रम सादर करण्यात आला. या मध्ये शाहीर खंडूजी शिरसाट व संच उत्कृष्ट असा जनजागृतीपर कार्यक्रम सादर करुन सर्वांनी मने जिंकुन घेवून ग्राहकांनी आपल्या असलेल्या हक्कांचे संरक्षण कश्या प्रकारे करावे या विषयावर सादरीकरण केले. स्थानिक नियोजन विभाग येथे राष्ट्रीय ग्राहक दिनाचा कार्यक्रम पार पडला.

# अग्रवाल समाज वेल्फेअर ने ग्रुपने केले अग्रवाल,भारुका यांचे स्वागत



**■अकोला,दि.१७ (प्रतिनिधी)■**

मनपा निवडणुकीत विजयी झालेले समाजाचे विजय अग्रवाल,सागर भारुका यांचे अकोला अग्रवाल वेल्फेअरचे गृप ने स्वागत केले. वेल्फेअरच्या पदाधिकाऱ्यांनी अग्रवाल व भारुका यांच्या निवासस्थानी उपस्थित होऊन त्यांचे जल्लोषात स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्यात.ि

वजय अग्रवाल व सागर भारुका यांनी उपस्थित समाजबंधूंचे आभार मानत समाजाच्या विकासावर सहकार्य करण्याचे आवाहन केले.या सत्कार कार्यक्रमात वेल्फेअरचे बजरंगलाल अग्रवाल,एड जयकुमार अग्रवाल, प्रदीप गोयनका,ललित गुप्ता, कमलकिशोर अग्रवाल, संजय टिकूपोते,मनोज टीबडेवाल, अभय गुप्ता, पवन बाछुका, एड गणेश अग्रवाल, संजय अग्रवाल मनपा, फुलचंद पटवारी,पुरुषोत्तम अग्रवाल, सुभाष बंसल,कमल अग्रवाल, विजय छावछरिया,विनय लोहिया,रोशन पोद्दार, विश्वनाथ सुरेका, अभिजीत गोयनका, राजेश पटवारी समवेत बहुसंख्य समाज बांधव उपस्थित होते.

# फेर मतमोजणीची आमदारांनी केली मागणी

**■अकोला,दि.१७ (प्रतिनिधी)■**

मनपा निवडणुकीची मतमोजणी आटोपल्यानंतर काही प्रभागातील मतमोजणीवर आक्षेप घेत आमदार साजिदखान पठाण, आमदार नितीन देशमुख व आमदार अमोल मिटकरी यांनी फेर मतमोजणीची मागणी करत केंद्रावर ठिय्या दिला. तशी तक्रार प्रशासनाकडे केली आहे.

महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी खदान, शासकीय गोदामात शुक्रवारी करण्यात आली. या प्रक्रियेनंतर काही प्रभागातील मतमोजणीवर उबाठा शिवसेनेचे आमदार नितीन देशमुख यांनी फेरमतमोजणीची मागणी केली. यावेळी आ. साजीद खान आणिआ. मिटकरी यांनी ठिय्या दिला, मात्र निवडणुकी विभागाने सदर मागणी फेटाळली.

# हिवरखेड शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा एकाच वेळी तब्बल ८ जणांची भारतीय सैन्य दलात निवड



**■पातुर,दि.१७ (प्रतिनिधी)■**

स्टाफ सिलेक्शन कमिशन द्वारे घेण्यात आलेल्या कॉन्स्टेबल पदाच्या भरतीमध्ये हिवरखेड शहरातील आठ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. यामध्ये रोहित येनकर, वैभव भालतीलक, ऋषिकेश कौसकार, अनिकेत निंबोकार, मयूर व्यवहारे,या मुलांचा तसेच चतुर्थी हागे, शिवानी वाकोडे, निकिता गावंडे या मुलींची निवड झाली. अभिमानाची गोष्ट म्हणजे चतुर्थी हागे या मुलीचे दोघेही भाऊ इंडियन आर्मी मध्ये अग्निवीर या पदावर कार्यरत आहे.आता कुटुंबातील तिघेही जन देशसेवा करणार आहेत.अतिशय प्रतिकूल परिस्थिती मध्ये संघर्ष करून या मुलांनी यश संपादन केले आहे. या मुलांच्या निवडीने सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे.या मुलांच्या यशाने गावात भव्य मिरवणूक काढून गावात सर्वत्र यांचा नागरिकांनी भव्य सत्कार केला. हिवरखेड शहरातील आणि ग्रामिण भागातील मुलांना स्पर्धा परीक्षाची प्रेरणा मिळावी म्हणून मा. महेंद्र कराळे सर यांनी प्रत्येक मुलांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला आणि पुढील आयुष्यात सुद्धा मोठया पदावर कार्यरत होऊन गावाचे नाव उंच करावे असे मार्गदर्शन केले.यावेळी द टारगेट अकॅडेमी हिवरखेड चे संचालक मा. गौतम इंगळे सर यांनी सुद्धा मुलांच्या यशाचे कौतुक केले.

## अकोला महानगरपालिका निवडणूक २०२५ २०२६

# मतदान व मतमोजणी प्रक्रिया शांततेत आणि यशस्वीरीत्या पार पडली

**■अकोला,दि.१७ (प्रतिनिधी)■**

दिनांक १५.०१.२०२६ रोजी अकोला जिल्ह्यामध्ये महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडली असून दिनांक १६.०१.२०२६ रोजी मतमोजणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. अकोला जिल्ह्यात मागील महानगरपालिका निवडणूक सन २०१७ मध्ये पार पडली होती. तब्बल ८ वर्षांनंतर ही निवडणूक होत असल्याने सर्व राजकीय पक्षांमध्ये तीव्र स्पर्धा निर्माण झाली होती.या पार्श्वभूमीवर सदर निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पाडणे, तसेच संपूर्ण कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण करणे यासाठी अकोला जिल्हा पोलीस दल पूर्णतः सज्ज होते. यासाठी मागील महिन्याभरापासून विविध स्वरूपाची प्रतिबंधात्मक व नियोजनबद्ध कार्यवाही करण्यात आली होती.दिनांक १५.१२.२०२५ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोग व राज्य शासनाकडून प्राप्त कायदा व सुव्यवस्था तसेच चउउ आचारसंहिता संदर्भातील परिपत्रकांच्या अनुषंगाने माननीय पोलीस अधीक्षक, अकोला श्री. अर्चित चांडक यांनी महानगरपालिका क्षेत्रातील सुरक्षा



व्यवस्थेचा सखोल आढावा घेतला. यावेळी एतच सुरक्षेबाबत सर्व आवश्यक खबरदारी घेण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तसेच स्थानिक संवेदनशील व अतिसंवेदनशील भागातील मतदान केंद्रांना भेट देऊन मतदानाच्या दिवशी असणाऱ्या बंदोबस्ताचा आढावा घेण्यात आला. यासंदर्भात SDPO d PSO यांना आवश्यक मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. सर्व SDPO व PSO यांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील मतदान केंद्रांना भेट देऊन सुरक्षा व्यवस्थेची पाहणी केली. या काटेकोर व नियोजनबद्ध बंदोबस्तामुळे मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली.महानगरपालिका निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने दिनांक १६.०१.२०२६ रोजी पार पडलेल्या मतमोजणीदरम्यान अकोला शहरात पोलीस दलाकडून करण्यात आलेला बंदोबस्त नियोजन अत्यंत सुरळीत, शिस्तबद्ध व प्रभावी ठरले. माननीय पोलीस अधीक्षक, अकोला श्री. अर्चित चांडक तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणी केंद्रे, परिसरातील संवेदनशील व अतिसंवेदनशील भाग तसेच वाहतूक व्यवस्थेवर काटेकोर लक्ष ठेवण्यात आले. सर्व ठिकाणी पुरेशा प्रमाणात पोलीस मनुष्यबळ तैनात करण्यात आले होते.मतमोजणीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. कायदा व सुव्यवस्था पूर्णतः अबाधित राखण्यात अकोला पोलीस दलाला यश आले. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपली कर्तव्ये दक्षतेने पार पाडत संपूर्ण प्रक्रिया शांततापूर्ण वातावरणात पार पाडली. या निवडणूक प्रक्रियेदरम्यान नागरिक, उमेदवार, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी तसेच माध्यम प्रतिनिधींनी दिलेल्या सहकार्याबद्दल अकोला पोलीस दलातर्फे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

# गळ्यात मांजा अडकला : वाहळयाचा युवक गंभीर

## खामगाव जवळील टेंभुर्णा फाट्यावरील घटना

**■पातुर,दि.१७ (प्रतिनिधी)■**

पातूर तालुक्यातील वहाळा बु.येथील शामसुंदर दिगंबर फाळके यांच्या गळ्यात पतंगचा मांजा अडकल्याने गंभीर झाल्याची घटना १५ जानेवारी रोजीच्या दुपारी चार वाजताच्या सुमारास खामगाव जवळील टेंभुर्णा फाट्यावर घडली आहे. शामसुंदर फाळके कामानिमित खामगाव येथे गेले होते.काम आटोपून दुचाकीने परत घरी येत असताना १५ जानेवारी रोजीच्या दुपारी चार वाजताच्या सुमारास टेंभुर्णा फाट्यावर त्यांच्या गळ्यात पतंगीचा मांजा अडकला. मांजा अत्यंत धारदार असल्याने त्यांच्या गळ्याला,हाताला गंभीर दुखापत झाली,घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदतीस धाव घेत जखमी युवकास खामगाव येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून, प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.सदर घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, सार्वजनिक ठिकाणी धोकादायक मांज्याच्या वापरावर बंदी घालण्याची मागणी होत आहे. विशेषतःसणासुदीच्या काळात अशा प्रकारच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



# समाजसंवादाचा दीपप्रज्वलन करणारी मराठा पाटील संघटनेची पदयात्रेस प्रारंभ



▪अकोला,दि.१७ (प्रतिनिधी)▪

मराठा पाटील समाजातील अंतर्मुख करणाऱ्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, परंपरेच्या नावाखाली रुजलेल्या अनिष्ट रूढींना छेद देण्यासाठी आणि भावी पिढीसाठी विवेकी, सुसंस्कृत समाजघडणीचा ध्यास घेऊन मराठा पाटील संघ बाळापुर तालुक्याच्या वतीने ङ्गसमाज संवाद पदयात्राङ्ग आयोजित करण्यात आली आहे. या ऐतिहासिक पदयात्रेचा शुभारंभ दि. १७ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता काजीखेड येथून मान्यवरांच्या शुभेच्छा व आशीर्वादाने झाला आहे.संस्थापक अध्यक्ष प्रा. राजदत्त मानकर यांच्या संकल्पनेतून साकारलेली व संघटनेचे अध्यक्ष शरद वानखडे यांच्या नेतृत्वाखाली निघणारी ही पदयात्रा दि. २६ जानेवारी पासून काजीखेड ते वाडेगाव या मार्गावरून प्रवास करणार आहे. सहभागी व्हा ! सहभागी व्हा! असा समाजाला साद घालणारा हा उपक्रम केवळ चालण्याचा नव्हे, तर विचारांचा, परिवर्तनाचा आणि आत्मपरीक्षणाचा प्रवास ठरणार आहे.समाजातील प्रश्नांवर थेट संवाद मराठा पाटील समाजातील लग्नसमारंभातील वाढते खर्च, वर-वधू संशोधनातील विलंब, कृषी शिक्षण, आरोग्य, बेरोजगारी यांसारख्या ज्वलंत प्रश्नांवर प्रत्येक गावात सभा घेऊन मुक्त विचारमंथन करण्यात येणार आहे.

## काजीखेड ते वाडेगाव समाजजागृतीचा प्रवासात सहभागी व्हा!! शरद वानखडे यांचे सहभागी होण्याचे आवाहन

समाजाने स्वतःशीच संवाद साधावा, प्रश्न ओळखावेत आणि उत्तरांची वाटचाल सामूहिकपणे करावी, हा या पदयात्रेचा मुख्य हेतू आहे.गावोगावी मुक्काम, संवाद व सहभाग पदयात्रेदरम्यान जानोरी मोखा, दगडखेड, सोनाळा, हसनापूर, अडोशी, सोनगिरी, वाडेगाव, मानकी, सांगवी, बाळापूर आदी अनेक गावांमध्ये मुक्काम व ग्रामसभा होणार असून दररोज सकाळी ८.३० वाजता पदयात्रा सुरू होऊन सायंकाळी ५ वाजता मुक्कामाच्या गावी पोहोचेल.सत्काराऐवजी संस्कारांना प्राधान्य संघटनेच्या वतीने समाजबांधवांना भावनिक आवाहन करण्यात आले आहे की, हार, शाल, पुष्पगुच्छ यांसारख्या दिखाऊ स्वागताला फाटा देऊन विचार, सहभाग व संवादाला प्राधान्य द्यावे. गावातील वारकरी दिंडी ग्रामप्रदक्षिणेसाठी पदयात्रा रथासमोर ठेवावी, गुणवंत विद्यार्थ्यांची यादी सादर करावी, महिला, युवक, युवती व बालकांचा सक्रिय सहभाग घडवून आणावा, असे आवाहन अध्यक्ष शरद वानखडे यांनी केले आहे.तसेच समाजाची दिनदर्शिका विक्री, पुढील गावापर्यंत पदयात्रेत सहभागी होण्याची संधी, तसेच उपवर मुला-मुलींचे बायोडाटा (ऑनलाईन प्रती) संकलन करून समाजोपयोगी उपक्रमांना चालना देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

परिवर्तनाची वाटचाल पावलोपावली ही पदयात्रा म्हणजे केवळ कार्यक्रम नव्हे, तर समाजाच्या आत्मशुद्धीचा यज्ञ आहे. प्रश्नांना भिडण्याचे धाडस, बदल स्वीकारण्याची तयारी आणि पुढील पिढीसाठी सुसंस्कृत समाजाची बीजे पेरणारा हा उपक्रम ठरणार असल्याचे मत समाजातील जाणकार व्यक्त करत आहेत.

मराठा पाटील समाजातील प्रत्येक घटकाने या समाज संवाद पदयात्रेत सहभागी होऊन, विचारांच्या या प्रवासाचा साक्षीदार व भागीदार व्हावे, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे मराठा योद्धा गजानन हरणे यांनी कळिवले आहे.

## पातूर नगर परिषदेची निवडणूक तत्काळ घ्या

**पातूर** : पातूर नगर परिषदेची निवडणूक प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असल्याने स्थानिक नागरिकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होऊनही प्रत्यक्ष मतदान घेतले जात नसल्याने, राज्य निवडणूक आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे तत्काळ निवडणूक घेण्याची मागणी करण्यात आली आहे.पातूर नगर परिषदेची मुदत डिसेंबर २०२१ मध्येच संपली आहे. तेव्हापासून आजपर्यंत म्हणजे सुमारे चार वर्षांचा कालावधी उलटूनही निवडणुका घेण्यात आलेल्या नाहीत. राज्यातील इतर नगर परिषदांच्या निवडणुका माहे डिसेंबर २०२५ मध्ये पार पडल्या आहेत, परंतु पातूरची निवडणूक क्षेत्र आणि मतदार याद्या अंतिम नसल्याचे कारण देऊन थांबवण्यात आली होती. निवेदनात म्हटले आहे की, पातूर पंचायत समिती आणि नगर परिषदेची प्रभाग रचना आता अंतिम झाली आहे.तसेच अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या असून आरक्षण सोडतीची प्रक्रिया देखील पूर्ण झाली आहे.

# दिपक रेळे यांच्या तत्परतेमुळे अपघातग्रस्ताचे प्राण वाचले

**अपघात दिसताच मदत करणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी**

▪अडगाव बु.,दि.१७ (प्रतिनिधी)▪

या विचारांना कृतीची जोड देत दैनिक महासागर व mcn news मराठी प्रतिनिधी दिपक रेळे यांनी एका अपघातग्रस्ताचे प्राण वाचवले. हिवरखेड मार्गावरील सूतगिरणी परिसरात झालेल्या गंभीर अपघातानंतर तब्बल अर्धा तास कोणतीही मदत न मिळालेल्या जखमीला तातडीने रुग्णालयात दाखल करून त्यांनी सामाजिक भानाचे दर्शन घडवले आहे.

हिवरखेड मार्गावरील सूतगिरणी जवळ शुक्रवार, १६ जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे ७.१५ वाजता हा अपघात घडला. रामटेकपुरा, अकोट येथील रहिवासी उत्तम मारुती दातीर हे शेतातून काम आटोपून एम.एच. ३० बी.के. ९९५९ क्रमांकाच्या दुचाकीवरून घरी परतत होते. याचवेळी अकोटहून हिवरखेडकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या एका पिकअप चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.धडक इतकी जबरदस्त होती की उत्तम दातीर हे दुचाकीसह रस्त्यावर कोसळले. या अपघातात त्यांच्या पायाला व डोक्याला गंभीर दुखापत झाली. मात्र अपघात घडविणाऱ्या पिकअप वाहनाच्या चालकाने घटनास्थळी थांबणे तर दूरच, जखमीला कोणतीही मदत न करता भरधाव वेगाने हिवरखेडच्या दिशेने पळ काढला. हा प्रकार पाहून परिसरात उपस्थित नागरिकांनी धाव घेतली होतयाच



दरम्यान चउछ छशुी मराठी प्रतिनिधी पत्रकार त्या ठिकाणी शॉप वर श्री महालक्ष्मी मार्बल शोरूम वर कामावर असल्यामुळे रात्रीच्या वेळेस बाहेर बसलेली होती त्यावेळेस त्यांचा ७:३० वाजता मोटरसायकलचा अपघात झाला त्यावेळेस दीपक रेळे हे तिथून त्यांचे मित्र सहित तिथपर्यंत गेले आणि यांचे त्या रस्त्याच्या कडेला जखमी अवस्थेत पडलेला व्यक्ती दिसताच त्यांनी क्षणाचाही विलंब न त्यांची ओळख होण्यासाठी त्यांनी लगेच आकोट ब्रेकिंग ग्रुप वर वर फोटो शेअर केले व वाहन थांबवले. अपघाताची गंभीरता ओळखून त्यांनी तातडीने मदतीचा निर्णय घेतला.

# जिल्हा बाल संरक्षण कक्ष अकोला चे प्रयत्न हरविलेल्या बालकाच्या कुटुंबाचा लावला शोध

▪अकोला,दि.१७ (प्रतिनिधी)▪

शेगाव स्टेशन येथे एक ११ वर्षाचे बालक विना पालक फिरत असताना रेल्वे पोलिसांना आढळून आले श्री तेलंग सर रेल्वे पोलीस शेगाव यांनी तातडीने बाल कल्याण समिति सदस्य प्रांजली जैस्वाल यांना भ्रमणध्वनी द्वारे संपर्क करून त्या बाबत माहिती दिली व पुढे काय करावे या बाबत माहिती घेतली व बालक आणि प्रांजली जैस्वाल सदस्य बाल कल्याण समिती यांचे व्हिडिओ कॉलिंग द्वारे संभाषण झाले.

बालकांचे वैद्यकीय तपासणी करून बालकास अकोला येथील शासकीय बालगृह येथे दाखल करणे बाबत रेल्वे पोलीस यांना सूचना दिल्या तसेच रेल्वे चाईल्ड हेल्प लाईन अकोला ची मदत घेणे बाबत सुचित केले बालकास रेल्वे पोलीस शेगाव आणि रेल्वे चाईल्ड हेल्प लाईन चे कर्मचारी राहुल चोरपगार यांनी शासकीय बालगृह अकोला



येथे दाखल केले. तो बालक थोडा मंदबुद्धी आणि स्मित भाषि होता. बाल कल्याण समिति सदस्य ॲड शीला तोष्णीवाल यांनी जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे सुनील लाडूलकर यांना भ्रमणध्वनी द्वारे बालका बाबत माहिती दिली त्या नुसार सुनील लाडूलकर यांनी शासकिय बालगृह येथे जाऊन बालका सोबत संवाद साधला मात्र बालक काय सांगतो हे लक्षात येत नव्हते त्याला विश्वासात घेत आणखी संभाषण केले बालक जे काही सांगत होता त्या नुसार सदर बालक अमरावती जिल्ह्यातील असावा असे लक्षात आले तेव्हा अमरावती चे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्री अजय दबले यांना सुनील लाडूलकर यांनी संपर्क करून बालक बहुतेक अमरावती जिल्ह्यातील आहे.

# बोरगाव मंजू येथे विरंगुळा केंद्राचा स्थापना दिन सोहळा


**अकोला** : श्री संत गाडगे बाबा ज्येष्ठ नागरीक संघ बोरगांव मंजु रेणुका नगर विरंगुळा केंद्र येथे दि. १३ जानेवारी २०२६ मंगळवार रोजी सकाळी १० वाजता संघाचा १३ वा स्थापना दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या महामानवांच्यासुरुवातीला प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुजन, दिपप्रज्वलन करुन पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री संत गाडगे बाबा ज्येष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष श्री ह.भ.प. अर्जुन महाराज बारस्कर होते. तर प्रमुख अतिथी म्हणून बोरगांव मंजूच्या प. ना. विद्यालयाचे माजी प्राचार्य के. एम. जोशी, नाजुकरावजी गमे होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. ह.भ.प. अर्जुन महाराज बारस्कर यांनी श्री संत गाडगे बाबा ज्येष्ठ नागरीक संघाच्या १३ व्या वर्धापन दिनानिमित्त अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले तसेच के. एम. जोशी, प्रशांत सु. नागे, नाजुकरावजी गम, एस. जी. मोहन, पंडित वानखडे, सुधीरजी घुटे, डि.जी. अंबुलकर, एच. पी. मागे सर, शरद रामकृष्ण भिसे, अभिनेते शाम पिंपळकर यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक नंदकुमार देशमुख सर यांनी तर आभार प्रदर्शन एस. एस.. विंचुरकर यांनी मानले. या प्रसंगी कार्यक्रमाला संघाचे पदाधिकारी पांडुरंगजी बागडे, वसंतरावजी वाघमारे, एन. एम. यादव, प्रफुल वानखडे, प्रकाश तोताराम रामेकर, गणेश दत्तोपंत अलकार, माजी सभापती पं.स. अकोला गंगुबाई घामोळे, मंदाताई, आर. ई. जोशी, न्यामत शहा, उस्मान शहा, आरजे. बाजड, सुरेश देवराव लोखंडे, डि. एस. उमाळे आदी गावातील प्रतिष्ठीत नागरीक रमेश समुद्रे, अमित इंगळे इत्यादीसह मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरुची भोजनानंतर कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# बालविवाह मुक्त अकोला जिल्ह्यासाठी ऑनलाईन शपथ अभियान नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन


▪अकोला,दि.१७ (प्रतिनिधी)▪

बालविवाहासारखी सामाजिक कुप्रथा रोखण्यासाठी येथील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय व जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या वतीने 'बालविवाह मुक्त अकोला जिल्हा अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत नागरिकांना बालविवाह विरोधी ऑनलाईन शपथ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.या उपक्रम ाअंतर्गत केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री श्रीमती अन्नपूर्णा देवी यांच्या स्वाक्षरीचे स्वतःच्या नावाचे प्रमाणपत्र ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध होणार आहे. नागरिकांनी htts:stochildmarriage.wed.gov.in/camaign या संकेतस्थळावर भेट देऊनऑनलाईन शपथ घ्यावी व प्रमाणपत्र त्वरित डाउनलोड करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



बालविवाहामुळे मुलींच्या शिक्षण, आरोग्य व भविष्यावर गंभीर आणि विपरीत परिणाम होत असल्याने समाजातील प्रत्येक घटकाने याविरोधात एकत्र येणे अत्यंत आवश्यक आहे. एक व्यक्तीची शपथ म्हणजे एका मुलीच्या सुरक्षित आणि उज्वल भविष्यासाठी उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल असून नागरिकांनी मोठ्या संख्येने या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, श्री गिरीश पुसदकर यांच्या वतीने करण्यात आले आहे. ऑनलाईन शपथ घेण्याची प्रक्रिया नागरिकांनी गुगलवर बाल विवाह मुक्त भारत पोर्टल (इरश्र तळींरह चींज्ञीं इहरीरीं झींीरश्र) असे टाईप करून संबंधित संकेतस्थळ उघडावे. त्यानंतर लॉगिन वर क्लिक करून टेक प्लेज (ढरज्ञश झश्रशवसश) या पर्यायाची निवड करावी. आवश्यक वैयक्तिक माहिती भरून सबमिट बटनावर क्लिक केल्यानंतर बालविवाह प्रतिबंधाची,प्रतिज्ञा दिसेल. मी प्रतिज्ञा घेतली या पर्यायावर क्लिक केल्यानंतर प्रमाणपत्र डाउनलोड करता येईल. बालविवाह मुक्त भारत व बालविवाह मुक्त अकोला जिल्हा घडविण्यासाठी सर्व नागरिकांनी या ऑनलाईन शपथ अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा,

# श्री क्षेत्र ऋण मोचन येथे संत श्री गाडगे महाराज संस्था वस्त्र दान, अन्नदान सोहळा



**अकोला :** दिन दुबळ्या अनाथ अपंगांना किमान एक वेळ तरी पोटभर अन्न मिळावे म्हणून सन १९०७ साली श्री गाडगे महाराजांनी श्री क्षेत्र ऋण मोचन येथे दरवर्षी पौष महिण्यात सदावर्त सुरु केले.गाडगे महाराज यांच्या आशिर्वादाने ६३ वर्षापासून अकोला अमरावतीच्या व्यापाऱ्यांच्या सहकार्याने श्री संत गाडगे महाराज सेवा समिती तर्फे पौष महिण्यात शेवटच्या रविवारी वस्त्र दान केले जाते.अश्या या तीर्थक्षेत्री दरवर्षी प्रमाणे यंदाही अन्नदान, वस्वदान आणि कथा कीर्तनाद्वारे ज्ञानदानाचे कार्यक्रम आयोजित केले आहेत. भक्त मंडळींच्या सहकार्याने हे सेवा कार्य अखंड सुरु आहे. कार्यक्रमाला येण्याकरिता इच्छुक भक्त गणासाठी पौष महिन्याच्या शेवटच्या रविवारी न्यू क्लॉथ मार्केट, गांधी रोड येथून रविवार १८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७:३० वाजता बस ची व्यवस्था करण्यात आली आहे.

# पूज्य सिंधी जनरल पंचायत ने केले आलिमचंदानी यांचे स्वागत



▪अकोला,दि.१७ (प्रतिनिधी)▪

मनपा निवडणुकीत प्रभाग १५ मधून विजयी झालेले हरीश आलिमचंदानी यांचे पूज्य सिंधी जनरल पंचायत ने स्वागत केले. पंचायतच्या पदाधिकाऱ्यांनी हरीषभाई आलिमचंदानी यांच्या निवासस्थानी हजेरी लावून त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. या वेळी प्रभाग १५ चे विजयी नगरसेवक बाळ टाळे यांचेही स्वागत करण्यात आले. आलिमचंदानी यांनी उपस्थित समाजबंधूंचे आभार मानत विकासावर आपले विचार मांडले. पूज्य सिंधी जनरल पंचायतीचे प्रमुख रमेशभाई जग्यासी यांच्या पुढाकारात पार पडलेल्या या स्वागत कार्यक्रमात पंचायतचे महासचिव कन्हैयालाल आहूजा, उपाध्यक्ष हरीषभाई कटारिया, शहर विभाग पंचायत अध्यक्ष भेरूमल वाधवानी, झूलेलाल नगर पंचायत अध्यक्ष सुरेंद्र नागदेव, कार्यकारिणी सदस्य प्रकाशभाई आनंदानी,धीरज बसंतवानी, महेश गलानी, विनय लालवानी, संजय हिरानंदानी, सुधीर बेलानी, पंचायत सचिव ब्रह्मा वलेचा आदि उपस्थित होते.

# विवेकानंद शाळेच्या शिरपेचात आनंदी ने खोवला मानाचा तुरा

▪अकोला,दि.१७ (प्रतिनिधी)▪

नागपूर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या विदर्भ विज्ञान स्पर्धेतील विदर्भ स्तरावरील पोस्टर मेकिंग स्पर्धेत ११ जिल्ह्यातील एकूण २५ विद्यार्थी सहभागी झाले होते.या सर्व विद्यार्थ्यां मधून तापडीया नगर येथील विवेकानंद शाळेची इयत्ता ८ वी ची कु. आनंदी मंगेश गावंडे हिने प्रथम क्रमांक पटकावला. तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. आनंदीने स्वतःमधील कल्पकतेचा कस लावून ' वन हेल्थ संरक्षण आणि वातावरण बदल' या विषयावर आधारीत सुबक रंगसंगती असलेले नयनरम्य असे चित्र रेखाटले. तिने या सूयशाचे श्रेय आई - वडिल, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संगिता कोकिळ,शाळेचे कलाशिक्षक मनोज वाडेकर यांना दिले.'चित्रकलेचा रोजचा सराव व वेळोवेळी वाडेकर यांचे मिळणारे म ार्गदर्शन प्रिन्सिपल यांचेकडून मिळणारे प्रोत्साहन हेच माझ्या यशाचे गमक आहे' असे आनंदी याप्रसंगी म्हणाली.शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे कौतूक करून राज्यस्तरा करीता तिला शुभेच्छा दिल्या आहेत.त्याचप्रमाणे शासकीय रेखाकला परीक्षा २०२५ चा निकाल प्रसिद्ध करण्यात आला दरवर्षी प्रमाणे यंदाही शाळेच्या निकाल शंभर टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.याएलिमेंट्री परीक्षेला एकूण २८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी श्रेणी



ए - २६, श्रेणी बी - १, श्रेणी - सी- १ विद्यार्थी पास झाले.सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अनिल पिंपरखेडे, संस्थेचे जेष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र पाठक, संस्थेचे कनिष्ठ उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष अविनाश नानोटी, संस्थेचे सचिव रवींद्र अभ्यंकर,संस्थेचे जेष्ठ सदस्य निशिकांत पुजारी, संस्थेचे सदस्य अनिरुद्ध खरे, समीर थोडगे, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. संगीता कोकीळ, माध्यमिक शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. मिनल कापसे, प्राथमिक शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. नयना हातवळणे, सर्व शिक्षक व शिक्षिकेतर कर्माचाऱ्यांनी स्वागत केले.

# प्रभातच्या दोन विद्यार्थ्यांची 'विद्यार्थी विज्ञान मंथन' मध्ये राष्ट्रीय स्तरावर निवड



▪अकोला,दि.१७ (प्रतिनिधी)▪

देशातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी राबविण्यात येणारी विद्यार्थी विज्ञान मंथन या भारतातील सर्वात मोठ्या डिजिटल आधारित विज्ञान प्रतिभा शोध परीक्षेअंतर्गत 'विद्यार्थी विज्ञान मंथन' २०२५-२६ च्या राज्यस्तरीय शिबिर (स्तर-३) परीक्षेत प्रभात किड्स स्कूल, अकोला येथील इयत्ता दहावीतील आर्या राजू राठी आणि इयत्ता आठवीतील अनन्या संजय ठाकरे यांनी उज्वल यश संपादन करत दोन विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकावून थेट राष्ट्रीय स्तरासाठी त्यांची निवड झाली आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांमधील विद्यार्थी सहभागी झाले होते.या अभूतपूर्व यशामुळे प्रभात किड्स स्कूल, अकोला तसेच संपूर्ण अकोला जिल्ह्याचा पुन्हा एकदा शैक्षणिक गौरव वाढला आहे. प्रभात किड्स स्कूलचे संस्थापक संचालक डॉ. गजानन नारे, सौ. वंदना नारे, प्राचार्य वृषाली वाघमारे यांच्यासह शिक्षकवर्गाने व पालकांनी विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमांचे, शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे व पालकांच्या सातत्यपूर्ण पाठिंब्याचे मनःपूर्वक कौतुक केले आहे.

या विद्यार्थ्यांना विज्ञान विभागाच्या विभाग प्रमुख मिता इंगळे यांच्यासह प्रियंका माणिकराव, पूनम दुबे व तांत्रिक सहाय्यमध्ये अनिरुद्ध डेकाटे यांचे मार्गदर्शन लाभले.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, **समूह संपादक :** संदीप रामराव काळे, **प्रबंध संपादक :** पंकज श्रीकृष्ण चांडक
**स्थानिक संपादक :** *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# मुंबई निकालातील हेच वास्तव



(एकसंघ) शिवसेनेने भाजपचा पराभवच केलाआहे! आकडेच सांगतात...भाजप हरला आहे! आधी २०२६ ची आकडेवारी लक्षात घ्या, मग २०१७ मध्ये जाऊ.

मुंबई महापालिका निवडणूक निकाल अखेर रात्री उशिरा जाहीर झाला. २२७ नगरसेवकांच्या महापालिकेत सत्तास्थापनेसाठी ११४ ही मॅजिक फिगर आहे. आता गणित लक्षात घेऊ.

भाजप ८९ + शिवसेना २४+ राष्ट्रवादी ०३ = ११६

शिवसेना - ठाकरे ६५ + मनसे ०६ + काँग्रेस २९ + राष्ट्रवादी शप ०१ + समाजवादी ०२ = १०३

एमआयएम : ०८ ( कुणाच्या पारड्यात दान टाकणार?)

पहिल्या गणितानुसार भाजपने महापौर बसवण्याचे ठरवले तरी शिंदे यांच्याकडे बार्गेनिंग पॉवर असणार आहे. कारण ११६ हा मॅजिक फिगरच्या काठावरील आकडा आहे. महापौरपद, स्थायी/सुधार समितीपद यापैकी शिंदे काहीही किंवा सर्वकाही मागू शकतात.

शिंदेंचे २४ नगरसेवक त्यांच्याकडेच राहतील, हे दस्तुरखुद्द शिंदेही ठामपणे सांगू शकत नाहीत. एक मोठा गट जर फुटला आणि पुन्हा मातोश्री गृही परतला तर? पडद्यामागे तशा हालचाली सुरू झाल्याच आहेत. तर तसे काही झालेच तर ठाकरे बंधू सत्तेत येतील.

ठाकरे बंधू सहज सत्तेत येतील असेही हे गणित नाही. शिंदे जर भाजपला नडण्याची शक्यता असेल तर त्याच आधारावर काँग्रेसही २९ च्या बळावर ठाकरे यांना खिंडीत गाठू शकते.

मातोश्री आणि वर्षा या दोन्ही बंगल्यावर रात्रीपासूनच खलबते सुरू झाली आहेत. कोण गळाला लागू शकेल याची चाचपणी होऊन यादी तयार होत आहे.

काठावरील मॅजिक फिगरच्या थोडे पार जाण्यासाठी टक्ट पक्षाला भाजप सोबत घेऊ शकतो. याआधी ₹पाया पडण्याचा₹ प्रयोग यशस्वी झालाच आहे, त्यामुळे ही युती झाल्यास भाजपाई नक्कीच चक्रावणार नाहीत.

सत्तेचा पट अशा तऱ्हेने मांडला जात आहे. भाजपने ठाकरे शिवसेनेपेक्षा फक्त जास्त जागा जिंकल्या आहेत. यातील ₹फक्त₹ हा शब्द लक्षात घ्या. कारण यातच सर्व काही लपलेले आहे आणि ते भाजपही मान्य करेल.

आता जाऊया २०१७ च्या निकालाकडे...तेव्हाची आकडेवारी देतो, म्हणजे भाजप पराभूतच झालाय हे विधान अधिक ठाम होईल.

२०१७ मध्ये महापालिकेतील पक्षीय बलाबल असे होते. (एकसंघ) शिवसेना ८४ आणि भाजप ८२.

म्हणजे २०२६ मध्ये भाजपच्या फक्त ०७ जागा वाढल्या आहेत. राज्यात, केंद्रात सत्ता, सोबत फोडलेली शिवसेना, जागोजागी केलेले लक्ष्मीदर्शन, तरीही भाजपला गेल्या आठ वर्षात फक्त ०७ जागाच जास्त मिळवत्या आल्या.

आता चित्र थोडे उलटे करूया. २०१७ मध्ये एकसंघ शिवसेना ८४ होती. नंतर ती फुटली/फोडली. आता जर ती एकसंघच असती तर?..आकडे बोलतात शिवसेना ठाकरे ६५ + शिवसेना शिंदे २४, म्हणजे एकूण ८९. याचाच अर्थ २०१७ पेक्षा २०२६ मध्ये ०५ जागा जास्त.

शिवसेना ठाकरे यांना फक्त ६५ जागा मिळाल्या याचा आनंद भाजपने बिलकुल साजरा करू नये. तब्बल ८० टक्के पक्ष फुटल्यानंतरही शिवसेना ठाकरे पक्षाने ६५ जागा जिंकून दुसरा नंबर मिळवला आहे आणि फुटलेल्या/फोडलेल्या ८० टक्के पक्षाला सोबत घेऊनही भाजपला फक्त ०७ जागा जास्तीच्या कमावत्या आल्या आहेत, हे वास्तव स्वीकारणे गरजेचे आहे.

मुंबई महापालिकेत भाजप आपला महापौर बसवणार किंवा बसवेलही कदाचित, पण या निवडणुकीत त्यांच्या हाती काहीच लागलेले नाही हे लक्षात घ्यायला हवे. सुपडा साफ होणार हा दावा आता आकडेवारीनेच खोटा ठरवला आहे. आठ वर्षांच्या सत्ता प्रवासात फक्त ०७ जास्तीचे नगरसेवक जिंकून येत असतील तर ते निर्विवाद यश कसे म्हणायचे?

**काही निरीक्षणे...**

२०१७ मध्ये एमआयएम पक्षाचे मुंबईत फक्त ०२ नगरसेवक होते. ते आता ०८ झाले आहेत. म्हणजे आठ वर्षात एमआयएमचे ०६ आणि त्याचवेळी भाजपचे ०७ नगरसेवक वाढतात. याकडे गंमत म्हणून पहिले तरी या वाढत्या संख्येकडे गंभीरपणे पाहायला हवे असे नाही का वाटत?

२०१७ च्या तुलनेत मनसेला फक्त एका जागेची घट झाली आहे. वाढ काहीच नाही. त्यामुळे राज ठाकरे यांनी गेल्या आठ वर्षातील आपल्या बदलणाऱ्या भूमिकांकडे वळून पाहायला हवे, असे मुंबईकरांना वाटते. किमान या निकालातून तेच अभिव्यक्त होत आहे.

शिवाजी पार्कमधील सभेत राज ठाकरे यांनी मराठी माणसाला अधिक पेटवले हे राजकीय निरीक्षक मान्य करतात. तो पेटलेला मराठी टक्काच यावेळी अनेक भागात एकगठ्ठा खाली उतरला आणि ठाकरे बंधूंच्या पारड्यात मतदान झाले.

वरळी, प्रभादेवी, दादर, परळ, लालबाग, शिवडी, घोडपदेव हा भाग आजही ठाकरेंचा बालेकिल्ला आहे हे तेथील मराठी माणसांनी दाखवून दिले आहे.

एकनाथ शिंदे यांनी शिवसेना फोडली नाही, तर फक्त माणसे फोडली हे वास्तव उघड झाले आहे. शिवसेना आजही तेथेच आहे. शिंदे यांची शिवसेना चार नंबरवर फेकली गेली आहे आणि ठाकरे शिवसेना दोन नंबरवर आहे. शिंदे यांनी हे गणित लक्षात घ्यावे. दुसऱ्या पक्षातील माणसे घेऊन फक्त गर्दी वाढते, हे विधान प्रत्येक पक्षाने किमान या निकालाच्या निमित्ताने तरी ध्यानात घ्यावे.

स्थानिक प्रश्न आणि उमेदवाराचे कार्य या आधारावर महापालिका निवडणूक होते खरी, पण यंदाच्या निवडणुकीला पक्षीय राजकारण, लक्ष्मी दर्शन, कंबरेखालील राजकीय टीका, अदानी, हिंदू आणि मराठीचा मुद्दा असे अनेक कंगोरे होते.

काही नवे चेहरे या सपोर्ट सिस्टिमवर निवडून आले असतील, पण जुने चेहरे त्यांच्यामुळे आणि त्यांच्या कार्यामुळे महापालिकेत गेले आहेत. मराठीचा मुद्दा या निवडणुकीत निर्णायक ठरला असला तरी यापुढे कुठल्याच पक्षाने मराठी माणसाला गृहीत धरू नये हा धडाच त्यांना मिळाला आहे. मराठी ताकद कमी लेखून चालणार नाही. त्यामुळे भाजप, शिंदे आणि ठाकरे बंधू या सर्वांनीच आता परप्रांतीय ठेकेदारांना जरा दूरच ठेवावे हे त्यांच्यासाठी उत्तम, हाच या निकालातून मराठी माणसांचा इशारा आहे.

राजकारणात मतदारच राजा असतो. नाहीतर तिकडे पुण्यात पवार काका पुतण्या धक्क्याला लागलेच नसते. मात्र या धबडग्यात मतदार राजाचे मतही अनाकलनीय आहे. पुण्यात जेलमधील गुंड निवडून आले म्हणतात. सुसंस्कृत पुण्यात असे घडावे हे धक्कादायकच आहे. शेवटचे, पण अखेरचे नव्हे! आलेल्या निकालातून शिंदे यांनी जेवढा बोध घ्यायला हवा, तेवढाच बोध ठाकरे बंधू यांनीही घ्यावा. निवडून आलेल्या उमेदवारांच्या विजयात या दोन्ही पक्षातील किचन कॅबिनेटचा यत्किंचितही वाटा नाही, हे दोन्ही प्रमुखांच्या लक्षात आले तरी खूप आहे.

कार्यकर्त्यांना आत्मचिंतन शिबिर हवे आहे. मुंबईच्या नादात नगरपरिषद निवडणुकांकडे या दोन्ही पक्षांचे कुठलेच नेतृत्व फिरकले नाही. किमान आता झेडपी निवडणुकीत तरी बंधूनी सीमोल्लंघन करावे, अशी कार्यकर्त्यांची इच्छा आहे. सत्ता कुणाचीही येवो, मुंबईत आवाज मराठी माणसाचाच आहे हे सर्वांनी लक्षात घ्यावे. आणि हो, या मराठी माणसांचा आम्हीच लाऊड स्पीकर आहोत या भ्रमात कुणी राहू नये आणि शेखी मिरवू नये.

---

## भटक्या कुत्र्यांची दखल अखेर सुप्रीम कोर्टाला का घ्यावी लागली?

भटक्या श्वानांमुळे झालेल्या अपघातात राजस्थान उच्च न्यायालयाचे दोन न्यायाधीश जखमी झाले. यातील एका न्यायाधीशाच्या पाठीच्या कण्यास मोठी दुखापत झाली असल्याची माहिती न्या. विक्रम नाथ यांनी सुनावणी दरम्यान दिली.

रस्त्यावर आणि गल्लोगल्ली फिरणा-या भटक्या श्वानांची संख्या नियंत्रित करण्यात असंख्य अडथळे असल्याचे त्रि सदस्यीय खंडपीठाने सांगितले. या खंडपीठात न्या. विक्रम नाथ, न्या. एन. व्ही. अंजारिया आणि न्या. संदीप मेहता यांचा समावेश आहे.

भटक्या श्वानांची समस्या केवळ दंशापुरती(चावा घेण्यापुरती) मर्यादित नाही. तर त्यांच्यामुळे अपघात देखील होऊ शकतात. अशी टिपणी सर्वोच्च न्यायालयाने सुनावनी दरम्यान केली. बऱ्याच वर्षानंतर याबाबत सर्वोच्च न्यायालयाला जाग आली. ते ही प्रकरण स्वतःच्याच लोकांवर शेकल्या गेल्यामुळे! नाहीतर अजूनही डोळे उघडले गेले नसते.



मिलिंद गड्डमवार
(मुक्त पत्रकार)
राजुरा जि. चंद्रपूर.
9511215200

गरीब, सामान्य जनतेला श्वान (कुत्रा) चावला? अन् जनता अपघातात जखमी झाली? असा कोणता फरक पडणार होता? परंतु त्या श्वानांना तरी काय माहित की आपणं कुणाला चावतो आहोत ते? आपणं कुणाच्या वाटी जात आहोत ते? बिच्चारे तोंडाशी पडले आणि त्यांच्या जीवावरच बेतले. असो. अखेर ती श्वानांचीच जात. त्यांना काय माहित? आपणं कुणा बरोबर पाला घेत आहोत ते.

हिवाळ्यात, थंडीत तशीही श्वानांची आणि इतर प्राण्यांची संख्या ही वाढत असते. यात दोष प्राण्यांचा नसतो. तो निसर्ग नियम आहे. भटक्या श्वानांवर नियंत्रण ठेवणे हे सोपे काम नाही. यासाठी सुप्रीम कोर्टाने श्वानांवर (कुत्र्यांवर) लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येक राज्याला आपली बाजू प्रतिज्ञापत्राव्दारे मांडण्यास सांगितले.

महाराष्ट्र सरकारने तर शाळेतील मुलांच्या सुरक्षिततेसाठी एखाद्या शिक्षकाची नोडल अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात यावी असे फर्माण काढले. शिक्षकांसाठी हे एक काम शिल्लक होते. असेच म्हणावे लागेल. अनेक सरकारी खात्यांमध्ये अश्या नोडल अधिकाऱ्यांची नेमणुक करण्यात यावी असे सुचविण्यात आले आहे.

खरे तर श्वानांवर आणि इतर पाळीव प्राण्यांवर नियंत्रण ठेवणे हे स्थानिक स्वराज्य संस्था ग्राम पंचायत, नगर पंचायत, नगर परिषद, नगर पालिका, महानगर पालिका यांचे काम आहे. यासाठी पशु वैद्यकीय अधिकारी आणि इतर प्राणी कल्याण संस्थांचे सहकार्य घेऊन काम करणे अपेक्षित आहे.

कुत्रे माणसांमधील भीती ओळखू शकतात आणि त्यामुळे ते हल्ला करतात किंवा चावा घेतात असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाचे न्या. विक्रम नाथ यांनी नोंदवले आहे. कुत्रे स्वतःहुन माणसांवर तुटून पडत नाहीत. त्यांना कुणीतरी दगड मारून त्रास दिला असतो. किंवा एखाद्या वाहनाने धडक देऊन जखमी केले असते. तेंव्हाच ते दुचाकी व चारचाकी वाहनांवर धावून जात असतात.

दुचाकी चालक घाबरल्याने अनेक अपघात घडतात. चारचाकीवाल्यांना तेवढी भिती नसते. याचसाठी कुत्र्यांच्या समोर कधीही धावू नये. एखादा कुत्रा पाठीमागे लागल्यास एकाच जागी स्थिर राहणे हे सुरक्षिततेच्या दृष्टीने चांगले असते असे सांगितले जाते.

कुत्र्यांचा चावा हा प्राण घातक असेलच हे सांगता येत नाही. घरगुती, पाळीव श्वानांना रेबीजचे इंजेक्शन दिलेले असते. भटक्या कुत्र्यांच्या दंशामुळे, चावण्यामुळे जंगली प्राण्यांना, माणसांना गंभीर इजा होऊ शकते. श्वान हे टोळीने फिरत असतात. ते एकत्रीतपणे लक्षावर तुटून पडतात.

त्यांच्या परिघात, परिसरात ते इतर श्वानांना प्रवेश करू देत नाहीत. याची दखल घेतली गेली पाहिजे. भटक्या कुत्र्यांचा दंश हानीकारक ठरू नये म्हणून त्यांचे लसीकरण करणे गरजेचे असते. निबीर्जीकरण केल्याशिवाय त्यांचे संख्येवर नियंत्रण ठेवणे शक्य होणार नाही.

सर्व राज्य सरकारांनी या गोष्टीवर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. ते करायचे सोडून नको ते आदेश काढल्याने जनतेत त्या आदेशाची अवहेलना होत असते. याची काळजी सर्व राज्य सरकारांनी घेतली पाहिजे. हाच यावरील रामबाण उपाय ठरू शकतो. हे विसरून कसे चालेल?

---

# सौभाग्याचं लेणं : कुंकू

मकर संक्रांत सण झाला कि सर्वत्र हळदी कुंकू समारंभांना सुरुवात होते. रथसप्तमी पर्यंत चालणाऱ्या या उत्सव काळात सर्वत्रच्या स्त्रिया उत्साहाने सहभागी होतात. विविध महिला मंडळे, सामाजिक संघटना, स्वयंसेवी संस्था यांसह राजकीय पक्षांच्या वतीनेही हळदी कुंकू समारंभ साजरे केले जातात.

महापालिका निवडणुकीचे निकाल नुकतेच जाहीर झाले आहेत. निवडून आलेले नवनिर्वाचित नगरसेवक यंदा हळदी कुंकू समारंभाच्या निमित्ताने प्रभागातील महिला मतदारांच्या भेटीला नक्कीच जातील. हळदी कुंकूंच्या दिवसांत कधी नव्हे ते स्त्रियांचे संघटन पाहायला मिळते.

यावेळी स्त्रियांना तिळगुळ वाटपासह वाण म्हणून काहीनाकाही वस्तू दिली जाते. या सर्वांत प्रमुख कृती असते ती हळद आणि कुंकू लावण्याची. सौभाग्याचे आणि समृद्धीचे प्रतिक म्हणून कपाळी हळद आणि कुंकू लावले जाते. स्त्रियांच्या दोन भुवयांमध्ये आज्ञाचक्राच्या स्थानी लावले जाणारे हळद कुंकू श्रद्धेने लावले जाते.

प्रत्येक स्त्रीमध्ये दुर्गादेवीचे तत्व असते, त्यामुळेच स्त्रीला 'शक्ती' असेही म्हणतात.

स्त्रिया एकमेकींना हळद कुंकू लावतात म्हणजे एकमेकांतील दुर्गादेवीच्या तत्वाचे पूजन करतात. संपूर्ण चेहऱ्याच्या संवेदनांसाठी जबाबदार असणारा मज्जातंतू हा याच भागात असतो.

दोन भुवयांच्या मध्यभागी मज्जातंतूच्या एकूण तीन शाखा असतात. या जागेवर दाब पडल्याने सायनसचा त्रास कमी होतो. डोळ्यांच्या महत्त्वाच्या नसा देखील याच भागात असतात आणि या नसा डोळ्यांच्या स्नायुंशी जोडलेल्या असतात.

या ठिकाणी थोडासा दाब दिल्यास दृष्टीही चांगली राहते आणि डोळ्यांचे आरोग्य सुधारते. माणसाच्या मनावर ताण आला कि कपाळावर आठ्या पडतात. शरीरातला सगळ्या गोष्टींचा ताण हा कपाळावरील त्या बिंदूच्या ठिकाणी जमा होतो. म्हणूनच त्या बिंदूला थोडीशी उत्तेजना दिल्यास आपला ताण कमी होतो, दृष्टी सुधारते आणि निद्रानाशही कमी होतो. त्यामुळे बिंदूदाबन, योगशास्त्रदृष्ट्या आणि आध्यात्मिकदृष्ट्याही कुंकू लावण्याचे अनेक लाभ आहेत.



सौ. मोक्षदा घाणेकर
काळाचौकी, मुंबई.

हळद आणि चुना किंवा हळद आणि लिंबू यांच्या मिश्रणतून कुंकू बनवले जाते. त्यामुळे कपाळी कुंकू लावण्याचे आयुर्वेदिक लाभही आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रियांसह पुरुषांनीही कपाळाला कुंकू लावण्याची प्रथा पूर्वापार चालत आली आहे.

आधुनिकतेच्या नावाखाली पूर्वापार चालत आलेल्या लाभदायक प्रथा हळूहळू लोप पावत चालल्या आहेत. हल्लीच्या स्त्रिया साडी केवळ सांस्कृतिक कार्यक्रमांना नेसतात तसे कुंकूही केवळ हळदी कुंकू समारंभातच लावले जाऊ लागले आहे.

कुंकूची जागा आता टिकलीने घेतली असून हळूहळू तिही नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. हल्लीच्या स्त्रियांवर हिंदी चित्रपटातील अभिनेत्रींचा प्रभाव अधिक असल्याने आज अनेक स्त्रिया उजाड माथ्याने वावरताना दिसतात.

काही स्त्रिया, मुली टिकली तर लावतात मात्र ती दुर्बीणीने शोधावी लागेल अशा आकाराची लावतात. आपल्या हिंदु प्रथा परंपरा या मानवाचे सर्वांगीण हित साधणाऱ्या असून त्या सर्वांमागे अध्यात्म, मानस आणि आरोग्यशास्त्र दडलेले आहे.

आज ते विज्ञानाच्या आधारावरही सिद्ध होत आहे. त्यामुळे पाश्चात्य संस्कृतीच्या आहारी जाऊन त्यांना त्यागण्यापेक्षा त्यांचा आपल्या दैनंदिन जीवनात अवलंब करणे हिताचे आहे. हळदी कुंकू साजरी करण्याच्या प्रथेतील व्यापक दृष्टिकोन लक्षात घेऊन स्त्रियांनी प्रतिदिन कपाळावर कुंकू लावण्याची सवय स्वतःला लावून घायला हवी.

---

# महापालिका निवडणुकीतही पुन्हा तोच गोंधळ !

(कालच्या अंकावरून पुढे)

---------------

उत्तरार्ध

जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

विधानसभा निवडणुका झाल्यानंतर महापालिकेच्या निवडणुका जाहीर होण्यात बराच कालावधी होता. या काळात याद्या अद्यावत का करण्यात आल्या नाहीत असा संतप्त सवाल मतदारांच्या मनात निर्माण होताना दिसला.

शहरांत दरवेळी मतदानाची वेळ सकाळी ७ ते सायंकाळी ६ पर्यंत असते. यंदा सकाळी आणि संध्याकाळी दोन्ही ठिकाणी अर्धा अर्धा तास कमी केल्याचे अनेकांना ज्ञात नव्हते त्यामुळे मतदान करून सकाळी लवकर कामावर जाणा?यांसह नागरिकांना मतदान केंद्रांवर सकाळी अर्धा तास विनाकारण तिष्ठत राहावे लागले.

वेळेचे गणित बिघडल्याने काहीजण मतदान न करताच कामावर जाताना दिसले. हीच स्थिती सायंकाळी पाहायला मिळाली. साडेपाचनंतर धावत पळत मतदान केंद्रांवर जाणाऱ्यांना मतदान न करताच परतावे लागले.

दुबार मतदारांमुळे अनेक ठिकाणी गोंधळाची परिस्थिती झालेली पाहायला मिळाली. या निवडणुकीत मतदान यंत्राच्या शेजारी व्हीव्हीपॅट यंत्र पाहायला न मिळाल्याने आपले मत नक्की आपल्या उमेदवारालाच गेले आहे कि अन्य कोणाला असा प्रश्न मतदारांना पडत होता.

अनेक ठिकाणी निवडणूक कर्मचारी कामात मुद्दामहून दिरंगाई करताना दिसून आले ज्यामुळे मतदान अत्यंत धीम्या गतीने होत होते अशा ठिकाणी मतदारांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या ज्यामुळेही काही मतदार मतदान न करताच मागे फिरकताना पाहायला मिळाले.

मतदारांच्या बोटाला शाई लावण्यासाठी यंदा पहिल्यांदाच मार्करचा वापर करण्यात आला होता. ही शाई सॅनिटायजर लावून जात असल्याने बोगस मतदान होण्यासाठीच ही नवीन पद्धत निवडणूक आयोगाने वापरली का असा थेट सवाल राजकीय नेत्यांकडून निवडणूक आयोगाला करण्यात येत होता. काही ठिकाणी यंदा पहिल्यांदाच पॅनल पद्धत अवलंबली गेल्याने आणि अनेक नागरिकही या नवीन पद्धतीविषयी अनभिज्ञ असल्याने गोंधळ निर्माण झालेला पाहायला मिळाला.

या नव्या पद्धतीमुळे मतदान केंद्रावर मतदारांचा बराच वेळ जात होता ज्यामुळे अशा ठिकाणी मतदारांच्या लांब रांगा लागलेल्या पाहायला मिळाल्या. हल्ली प्रत्येक निवडणुकीतील निवडणूक आयोगाचा हा भोंगळ कारभार नागरिकांमध्ये निवडणूक प्रक्रियेविषयी अविश्वास तर निर्माण करतोच, शिवाय बोगस मतदानासही वाव मिळवून देत आहे असे मत राजकीय जाणकारांकडून व्यक्त केले गेले आहे.

याशिवाय अनेक मतदार याद्यांमध्ये महिला मतदाराच्या नावासमोर पुरुषाचे छायाचित्र तर पुरुष मतदारांच्या नावापुढे महिलेचे छायाचित्र लावल्याचे दिसून आले. काही ठिकाणी ईव्हीएम मशिन्स बंद पडल्याने मतदारांचा संताप अनावर झालेला पाहायला मिळाला.

आपल्या जिल्ह्याचे भवितव्य ठरवणारी निवडणूक निर्विघ्न पार पडावी, नागरिकांनी या प्रक्रियेत एकदिलाने सहभाग घ्यावा यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो; मात्र प्रशासनाचा भोंगळ कारभार आणि नागरिकांचा निरुत्साह यांमुळे हे गणित कधी साधलेच जात नाही.

नागरिकांना पुन्हा पुन्हा आव्हान करूनही नागरिक आपली नावे मतदार याद्यांमध्ये आहेत कि नाही याबाबत आधीच खात्री करून घेत नाहीत. शहरासारख्या ठिकाणी आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे.

निवडणूक याद्यांमध्ये आपले नाव पडताळण्याची पद्धतसुद्धा प्रशासनाने अत्यंत सोपी केली आहे, तरीही नागरिक मतदार यादीतील आपले नाव शोधण्याचा प्रकार ऐन निवडणुकीच्या दिवशी करतात ज्यामुळे त्यांनाही हाल सहन करावे लागतात.

केवळ मतदारांना मतदान करण्यास उद्युक्त करणे पुरेसे नसून घरोघरी जाऊन घरातील सर्व प्रौढ व्यक्तींची नावे मतदार याद्यांमध्ये समाविष्ट आहेत का? घरातील मृत व्यक्तींची नावे याद्यांतून काढली गेली आहेत का ? नवीन मतदारांची नावे याद्यांमध्ये समाविष्ट झाली आहेत का ? या सर्व पडताळण्या निवडणुकीच्या आधी व्हायला हव्यात त्यासाठी निवडणूक प्रशासनाने स्वयंसेवी संघटना आणि राजकीय पक्ष यांचे साहाय्य घ्यायला हवे.

निवडणूक केंद्राच्या ठिकाणी मतदारांसाठी आवश्यक सुविधा करण्यात आल्या आहेत ना ? ज्या ठिकाणी लोडशेडिंग केली जाते अशा केंद्रांमध्ये जनरेटर आदी व्यवस्था केलेल्या असाव्यात.

सर्व मतदान केंद्रामध्ये पुरेशा सुविधांची उपलब्धता केल्याची खात्री प्रमुख पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधींकडूनही आदल्या दिवशी करून घेतली जावी. यंदाच्या महापालिका निवडणूक प्रक्रियेतून निवडणूक प्रशासन, राजकीय पक्षांसह नागरिकांनीही बोध घेऊन त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

---

## सेल्वाराज या चेन्नईच्या केसमध्ये स्त्रीधन बद्दल ट्रिब्युनलने काय सांगितले?

सोप्या भाषेत
इन्कमटॅक्स
आणि इन्वेस्टमेन्ट

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना.





गेल्या काही आठवड्यापासून आपण स्त्रीधन बद्दल माहिती घेत आहोत, आठवड्यात आपण बघितले की सी.बी.डी.टी. यांनी घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त सोनं महिलांना घरात ठेवता येतो का नाही? व जर घरात जास्त सोन्याचे दागिने ठेवुन ही टॅक्स लागु नए या साठी काय काळजी घेणे गरजेचे आहे. आज आपण स्त्रीधनबद्दल नवीन माहिती अधिसारख्याच सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रुपात बघणार आहोत.

**प्रश्न :** सेल्वाराज या चेन्नई च्या केस मध्ये स्त्रीधनबद्दल काय भूमिका घेण्यात आली?

■ असिस्टंट कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स विरुद्ध पी. सेल्वाराज या केस मध्ये इन्कमटॅक्स ऑफिसर यांनी स्त्रीधन ला मान्यता दिली. परंतु, स्त्रीधनच्या मात्राला म्हणजे क्वांटमला मान्यता नाकारली.

या केस बद्दलची माहिती अशी की करदात्याच्या पत्नीला तिच्या वडिलांकडून ८०० ग्रॅम सोन्याचे दागिने मिळाले होते. इन्कमटॅक्स अधिकारी यांनी वडील एवढ सोनं मुलीला थेट देऊ शकतात, यावर आश्चर्य व्यक्त केले. त्यांनी या पैकी ५०% दागिने वडिलांना करदात्याच्या पत्नीला दिले असे मान्य केले व उर्वरित जोडले.

या केस मध्ये इन्कमटॅक्स अधिकाऱ्याने स्वतःचे अनुमान तथा बिना पुराव्याचे स्वतःचे अंदाज लावले. करदात्याचे सासरे हे मोठे टेक्स्टाईल मर्चंट होते आणि कोलम्बोमध्ये राहत होते. या महत्वाच्या माहितीकडे इन्कमटॅक्स अधिकाऱ्याने लक्ष दिले नाही.

याकडे चेन्नई ट्रिब्युनल यांनी लक्ष देऊन इन्कमटॅक्स अधिकाऱ्यावर ताशेरे ओढून देणाऱ्याची ऐपत सुद्धा बघण्यात यावी, असे सांगितले, तथा पूर्ण ८०० ग्रॅम सोन्याच्या दागिन्यास स्त्रीधन म्हणून मान्यता दिली.

पुढील आठवड्यात आपण बघणार आहोत की, दिल्ली ट्रिब्युनल ने प्रसिद्ध रितु बजाज केस मध्ये स्त्रीधन ला मान्यता दिली की नाही?

■ ■ ■

---

## बद्धकोष्ठतेची समस्या? सकाळच्या ब्रेकफास्टमध्ये फॉलो करा या हेल्दी हॅबिट्स



बद्धकोष्ठतेची समस्या आजकाल अनेकांना भेडसावत आहे. यामागील मुख्य कारण म्हणजे चुकीची जीवनशैली. अनियमित दिनचर्या, वेळेवर शौच न करणे, वारंवार शौचेला येणारी इच्छा दाबून ठेवणे यामुळे आतड्यांची नैसर्गिक हालचाल मंदावते. पुरेसे पाणी न पिणे हे बद्धकोष्ठतेचे मोठे कारण आहे.

शरीरात पाण्याची कमतरता असल्यास मल कठीण होतो व सहज बाहेर पडत नाही. याशिवाय शारीरिक हालचालींचा अभाव, सतत बसून काम करणे, व्यायाम न करणे यामुळे पचनसंस्था आळशी बनते. ताणतणाव, चिंता आणि मानसिक अस्थिरता याचाही थेट परिणाम पचनावर होतो, ज्यामुळे बद्धकोष्ठता निर्माण होते. फायबरयुक्त अन्न जसे की फळे, भाज्या, संपूर्ण धान्ये यांचा अभाव असल्यास पचनक्रिया मंदावते.

फास्ट फूड, मैदा, तेलकट व प्रक्रिया केलेले पदार्थ अधिक प्रमाणात खाल्ल्याने आतड्यांचे आरोग्य बिघडते. चहा, कॉफी, मद्य यांचे अति सेवन आणि अनावश्यक औषधांचा वापर यामुळेही बद्धकोष्ठता वाढते. बद्धकोष्ठतेवर तात्पुरता उपाय न करता तिचे मूळ कारण ओळखणे महत्त्वाचे आहे.

जर पोट जास्त काळ स्वच्छ केले नाही तर बद्धकोष्ठतेची समस्या उद्भवते. पावडर खाण्याऐवजी निसर्गाने दिलेली तीन फळे खाणे हा पचन आणि बद्धकोष्ठतेवर सर्वात सुरक्षित आणि नैसर्गिक उपाय आहे.

**किवी :** किवी पोटासाठी खूप गुणकारी मानली जाते. यात ॲक्टिनिडिन नावाचे एक नैसर्गिक एन्झाइम असते, जे पचन वेगवान करण्यास मदत करते. तसेच, किवीमध्ये विद्रव्य फायबर समृद्ध आहे.

हे फायबर स्टूलला मऊ बनवते, ज्यामुळे ते आतड्यांमधून सहजपणे जाऊ शकते आणि पोट स्वच्छ करण्यास मदत करते.

**पेरू :** पेरू हे बऱ्याच पौष्टिक तज्ञांचे आवडते फळ आहे, कारण त्यात फायबरचे प्रमाण खूप जास्त आहे. पेरूमध्ये असलेले विद्रव्य फायबर आतड्यांसंबंधी हालचालींमध्ये सहाय्यक आहे.

पेरू बियाण्यासोबत खाणे अधिक फायदेशीर आहे, कारण बिया नैसर्गिक रेचक म्हणून काम करतात. पेरूचे नियमित सेवन केल्याने पोट स्वच्छ होण्याची समस्या कायमची दूर होऊ शकते.

**पपई :** पपई पोटाच्या आरोग्यासाठी वरदान मानली जाते. पपईमध्ये पपेन नावाचे पाचक एंजाइम असते, जे अन्नात असलेल्या प्रथिनांचे पचन सुधारते. याशिवाय पपईमध्ये फायबर आणि पाणी भरपूर प्रमाणात असते.

पपईमध्ये असलेले पाणी मलाला मऊ ठेवते आणि आतड्यांमधील घट्टपणा दूर करते . सकाळी रिकाम्या पोटी पपई खाल्ल्याने पचनसंस्था सक्रिय होते आणि बद्धकोष्ठतेपासून त्वरित आराम मिळतो. त्यामुळे अशा फळांचे सेवन करणे लाभदायी आहे.

■ ■ ■

---

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### जाग तरुणा जाग!

समाज आहे विस्कळीत
गुन्हेगार आहेत संघटीत
म्हणून महिलांचे अपहरण
बलात्कार वाढले अगणित ..!

तरुणांचे कृतीदल व्हावे
गावोगावी संघटीत
नाथाळांचे माथी हाणू काठी
संदेश आणावा कृतीत ..!

नका पाहू जात पंथ
हिंदू सारे एक आहेत
दुहीचा गैरफायदा घेऊनच
अत्याचार झाले आहेत ..!

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हे महानगर पालिका निवडणुकीतील भाजपच्या ऐतिहासिक विजयाचे धुरंधर शिल्पकार



**नागपूर, १७ जानेवारी :** महापालिका निवडणुकांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकसित महाराष्ट्राच्या प्रचाराला राज्यातील जनतेने उत्स्फूर्तपणे पाठिंबा व्यक्त केल्याचे चित्र निकालांमुळे स्पष्ट झाले आणि त्याच बरोबर शहरी मतदाराची अचूक नस माहिती असलेल्या भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केलेल्या विचारधारेसोबत राहण्याच्या आवाहनाला मतदारांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे निकालांवरून दिसले. मागील वर्षी जानेवारीत रविंद्र चव्हाण यांनी भाजपा प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदाची धुरा सांभाळल्यानंतर राज्यात दीड कोटी प्राथमिक सदस्यांचा टप्पा गाठण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले होते तिथेच ते अर्धी लढाई जिंकल्याचे आज या दणदणीत विजयाने स्पष्ट झाले.

भाजपा हा धोरण आखणारा आणि धोरण राबविणारा पक्ष आहे. निवडणुकांचे नियोजन, तिकीट वाटप, सभांचे नियोजन याबरोबरच विरोधी पक्षांना जोखण्याचे कसब देवेंद्र आणि रविंद्र या भाजपाच्या जोडीकडे आहे. सरकार आणि भाजपा महाराष्ट्र प्रदेश पक्ष यातील समन्वयाचे हे यश असल्याने हा अभूतपूर्व विजय मिळाल्याचे विश्लेषण राजकीय पंडितांनी केले आहे. महाराष्ट्र प्रदेश भाजपाचे शीर्षस्थ नेतृत्त्व म्हणून पक्षासाठी वाट्टेल ते करण्याची तयारी रविंद्र चव्हाण यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात बोलून दाखवलेली. त्यांच्या रूपाने भाजपाला रस्त्यावर उतरून आंदोलन केलेला आणि मातीशी जोडलेला कार्यकर्ता अध्यक्ष म्हणून मिळाला. निवडणूक काळातील वक्तव्याने, पेहरावाने झालेल्या वैयक्तिक स्वरूपाच्या टीकेमुळे रविंद्र चव्हाण बिलकुल विचलित झाले नाहीत. उलट त्यांनी विरोधकांना जनतेसाठी अनावश्यक अशा विषयात गुंतवून ठेवून, भाजपासाठी विजयाची वाट अधिक सुकर केल्याचे स्पष्ट झाले. विरोधकांनी चव्हाण यांच्यावर केलेल्या वैयक्तिक टीकेला जनतेच्या दृष्टीने कवडीमोल किंमत असल्याचेही या निमित्ताने दिसले. २५ वर्षांच्या राजकीय वाटचालीत रविंद्र चव्हाण त्यांच्यावर झालेल्या प्रत्येक टीकेनंतर एक पाऊल पुढे जातानाच दिसले. याचे कारणच कायम संघर्ष करून यश संपादन केलेला रविंद्र चव्हाण यांच्यासारखा नेता महाराष्ट्रातील जनतेने अजून नीटसा पाहिलेला वा ओळखलेला नाही आणि राजकीय निरीक्षकांनी अजून अभ्यासलेला नाही. रविंद्र चव्हाण हे अत्यंत मुरलेले आणि मुरब्बी राजकारणी म्हणून महाराष्ट्रात आजच्या भाजपाच्या विजयाने उदयास आलेले आहेत हे दिसले.

देवेंद्र फडणवीस यांना रविंद्र चव्हाण यांची बलस्थानं माहिती आहेत. पक्षासाठी २४ तास समर्पित अध्यक्ष म्हणून त्यांचे महत्त्व फडणवीस जाणून आहेत. रविंद्र चव्हाण यांचा शहरी महाराष्ट्राच्या राजकारणाचा अनुभव आणि त्यांची कायम निवडणूक सिद्धता म्हणजेच इलेक्शन रेडीनेस अशा स्वरूपाची कार्यशैली देवेंद्र फडणवीस ओळखून आहेत. त्यातच अडीच वर्षे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून काम करताना अवघा महाराष्ट्र पिंजून काढत रविंद्र चव्हाण यांनी खात्याच्या माध्यमातून विकासकामे करताना संपूर्ण महाराष्ट्रात हेरलेली आणि पेरलेली माणसं ही भाजपासाठी महत्त्वाची ठरली असं दिसत आहे.

# लेखिका ममता कालिया आणि मणिपुरी लेखिका अरामबम ओंगबी मेमचौबी यांना 'आकाशदीप' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार



**नवी दिल्ली, १७ जानेवारी :** साहित्य क्षेत्रातील त्यांच्या सर्वांगीण योगदानाबद्दल, २०२५ चा अमर उजालाचा सर्वोच्च शब्द सम्मान –'आकाशदीप' हिंदी भाषेसाठी प्रख्यात लघुकथा लेखिका ममता कालिया यांना आणि हिंदीतर भाषा श्रेणीमध्ये नामवंत मणिपुरी लेखिका अरामबम ओंगबी मेमचौबी यांना प्रदान करण्यात येणार आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषित केले होते आणि २०२५ हे त्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे, तर २०२६ हे वर्ष देखील संयुक्त राष्ट्रसंघाने शेती क्षेत्रातील महिलांच्या योगदानाला समर्पित केले आहे. या पार्श्वभूमीवर, या दोन महिला साहित्यिकांचा सन्मान केला जात असल्याने या पुरस्काराला एक विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

ममता कालिया अरामबम ओंगबी या सन्मानाचे स्वरूप प्रत्येकी ५,००,००० रुपये रोख, प्रशस्तीपत्र मेमचौबी आणि प्रतीक म्हणून गंगा मूर्ती असे आहे.

मणिपुरी भाषेतून आपल्या विपुल लेखनाद्वारे उत्तर-वसाहती विचार आणि स्त्री अस्मितेमध्ये विलक्षण योगदान देणाऱ्या अरामबम ओंगबी मेमचौबी यांचा जन्म १ जानेवारी १९५७ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव डॉ. थौनाओजम चानू इबेमहाल आहे. 'मैतेई' दंतकथांवरील त्यांच्या विशेष कार्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या मेमचौबी या समकालीन मणिपुरी साहित्य क्षेत्रातील एक प्रभावी व्यक्तिमत्व आहेत.

हिंदीतील सर्वोच्च 'आकाशदीप' शब्द सम्मानासाठी निवड झालेल्या ममता कालिया यांचा जन्म २ नोव्हेंबर १९४० रोजी झाला. स्त्रीवादाच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी आपल्या लेखनातून एक नवीन वाट निर्माण केली. अनेक उल्लेखनीय साहित्यकृतींचे लेखन केले असून, मध्यमवर्गीयांचे गुंतागुंतीचे जीवन आणि स्त्रियांचा संघर्ष प्रभावीपणे मांडण्यासाठी त्या ओळखल्या जातात.

'आकाशदीप' सन्मानांतर्गत आतापर्यंत हिंदीव्यतिरिक्त कन्नड, मराठी, बंगाली, ओडिया, मल्याळम आणि गुजराती भाषांना गौरवण्यात आले असून ; यंदा मणिपुरी भाषेची निवड करण्यात आली आहे. हिंदीतर भारतीय भाषांच्या श्रेणीमध्ये गिरीश कर्नाड, भालचंद्र नेमाडे, शंख घोष, प्रतिभा राय, एम.टी. वासुदेवन नायर आणि सितांशु यशश्चंद्र हे या सन्मानाचे मानकरी ठरले आहेत ; तर हिंदीमध्ये नामवर सिंह, ज्ञानरंजन, विश्वनाथ त्रिपाठी, शेखर जोशी, विनोद कुमार शुक्ल आणि गोविंद मिश्र यांना 'आकाशदीप' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

# १९ जानेवारी: काश्मिरी हिंदूंच्या विस्थापनाचे भीषण वास्तव आणि ३६ वर्षांची भळभळती जखम !

१९ जानेवारी १९९० ! हे वर्ष आणि हा दिवस नुसता आठवला तरी आजही प्रत्येक काश्मिरी हिंदूचा थरकाप उडतो. पृथ्वीवरचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काश्मीर खोऱ्यात याच दिवशी माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली. ५ सहस्र वर्षांपूर्वीची काश्मीरची पुरातन आणि समृद्ध संस्कृती संपवण्यासाठी धर्मांध जिहादी शक्तींनी हिंदूंचा अक्षरश: वंशविच्छेद आरंभला.

१९८९ पासूनच काश्मीरमध्ये दडपशाही आणि हिंसाचाराचे सत्र सुरु झाले होते, ज्याचा स्फोट १९ जानेवारी १९९० च्या त्या काळरात्री झाला. या दिवशी काश्मीर खोऱ्यातील सुमारे ४ लाख ५० हजार हिंदूंना, म्हणजेच तिथल्या एकूण लोकसंख्येच्या ९९ टक्के हिंदूंना आपल्याच देशात निर्वासित व्हावे लागले. केवळ अंगावरील वस्त्रांनिशी, स्वतःचे हक्काचे घरदार आणि कष्टाने कमावलेली संपत्ती सोडून त्यांना जीवाच्या आकांताने पलायन करावे लागले. जगातील काही मोठ्या आणि वेदनादायी विस्थापनांपैकी हे एक होते, तरीही दुर्दैवाने या हिंदूंच्या साहाय्याला त्या वेळी ना कोणी सरकार धावून आले, ना कोणी मानवाधिकार संघटना.

भीतीचे तांडव आणि हिंदूंसमोर ठेवलेले पर्याय त्या दिवशी स्थानिक वर्तमानपत्रांतील विज्ञापने, भिंतीवरील पत्रके आणि मशिदींवरील लाउडस्पीकर्समधून काश्मिरी हिंदूंना उघड धमक्या देण्यात आल्या होत्या. काश्मिरात रहायचे असेल, तर अल्ला-हो-अकबरम्हणावे लागेल, आम्हाला पाकिस्तान हवे आणि हिंदू स्त्रिया हव्यात, पण त्यांचे पुरुष नकोत, अशा अंगावर शहारे आणणाऱ्या घोषणांनी आसमंत भरून गेला होता.

आतंकवाद्यांनी हिंदूंसमोर केवळ तीनच पर्याय ठेवले होते एकतर धर्मांतर करा, काश्मीर सोडा किंवा मरण्यास तयार व्हा. या धमक्यांना न जुमानता ज्यांनी धर्मांतर करण्यास नकार दिला, त्यांना आपल्या प्राणांची किंमत मोजावी लागली. हिंदूंनी आपली भूमी आणि मालमत्ता यांचा त्याग करून अब्रू वाचवण्यासाठी पलायन करणे स्वीकारले ; परंतु जे मागे राहिले किंवा ज्यांना पळता आले नाही, त्यांच्यावर अनन्वित अत्याचार झाले.

नृशंस हत्याकांड आणि हृदयाचा थरकाप उडवणाऱ्या घटना काश्मीरमधील हिंदूंच्या कत्तली, स्त्रियांवर झालेले बलात्कार आणि देवळांचा विध्वंस हा इतिहास लपवता येणार नाही. उधमपूर जिल्ह्यातील प्राणकोट येथील हत्याकांडाने तर क्रौर्याची परिसीमा गाठली होती. तेथे २६ निष्पाप हिंदूंची हत्या करण्यात आली, ज्यात काहींना कुऱ्हाडीने तर काहींना लाठीहल्ल्याने ठार मारण्यात आले. तत्कालीन गृहमंत्री आणि काँग्रेस नेत्यांनीही घटनास्थळी भेट देऊन याला 'पाशवी नरसंहार' म्हटले होते.

अशीच एक मन सुन्न करणारी घटना म्हणजे ८ जून १९९९ ची. अवघ्या ६ वर्षांच्या सीमा नावाच्या मुलीने आपल्या डोळ्यांदेखत जे बघितले, ते कोणत्याही पाषाणहृदयी माणसालाही रडवेल. आतंकवाद्यांनी तिच्या वडिलांना आणि भावांना घरात घुसून तिच्यासमोरच हालहाल करून मारले. तिचा १३ वर्षांचा भाऊ राजिंदर याचे शीर धडावेगळे केले आणि आईला गोळ्या घातल्या. संपूर्ण कुटुंब गमावलेली ती चिमुरडी सीमा त्या दिवशी नशिबाच्या भोगवट्याला सामोरी जाण्यासाठी एकटीच उरली होती. तिच्या सांत्वनालाही तिथे कोणी नव्हते.

धार्मिक आणि सांस्कृतिक विध्वंस केवळ माणसे मारली गेली नाहीत, तर हिंदूंची अस्मिताही चिरडण्यात आली. १९९२ मध्ये अयोध्येतील बाबरी ढाचा पडल्याच्या रागातून काश्मीरमधील अनंतनाग, श्रीनगर, बारामुल्ला आणि झेलम नदीकाठची अनेक प्राचीन मंदिरे जमीनदोस्त करण्यात आली. काश्मीरमध्ये जिथे एकेकाळी वेदांचे पठण होत असे, तिथे १०३ हून अधिक सांस्कृतिक व धार्मिक संस्थांची नासधूस झाली. २० हजार घरांची जाळपोळ झाली आणि ९५ टक्के हिंदूंची घरे लुटली गेली. ९३ हजारांहून अधिक हिंदूंच्या कत्तली झाल्याचा अंदाज वर्तवला जातो. आज तिथे हिंदूंची भव्य घरे भग्नावशेषात बदलली आहेत आणि मंदिरांच्या जागी स्मशानशांतता पसरली आहे.



: संकलक :

**रमेश शिंदे, राष्ट्रीय प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती**

लपवलेले सत्य आणि 'फॅक्ट'चा लढा जगाच्या इतिहासात ज्यू आणि इतरांवर झालेल्या अत्याचारांची दखल घेतली गेली, त्यांची स्मारके उभी राहिली ; परंतु स्वतःच्याच देशात निर्वासित झालेल्या काश्मिरी हिंदूंचे दुःख जगासमोर मांडायला कोणीही पुढे आले नाही. तत्कालीन निधर्मी सरकारांनी हे सत्य दडपण्याचाच प्रयत्न केला. मात्र, फ्रेंच पत्रकार श्री. फ्रान्सुआ गोतिए यांनी पुढाकार घेतला. त्यांनी 'फॅक्ट' या छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून काश्मीर आणि बांगलादेशातील हिंदूंच्या अत्याचारांचे भीषण वास्तव जगासमोर मांडले. हिंदु जनजागृती समितीनेही हे प्रदर्शन देशभरात ५०० हून अधिक ठिकाणी लावून लोकांचे डोळे उघडण्याचे कार्य अविरतपणे चालू ठेवले आहे.

हिंदूंनो, आता तरी जागे व्हा ! आज ३६ वर्षांनंतरही बहुतांश काश्मिरी हिंदू न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. काश्मीरमधील दहशतवाद आता केवळ खोऱ्यापुरता मर्यादित राहिलेला नसून तो आता देशाच्या आणि आपल्या दाराशी येऊन ठेपला आहे. १९ जानेवारीच्या निमित्ताने हे भीषण वास्तव पुन्हा एकदा मांडण्यामागचा उद्देश हाच आहे की, हिंदूंनी आता तरी गाफील राहू नये. राजकीय पक्ष आणि प्रसारमाध्यमांनी लपवून ठेवलेले हे सत्य जाणून घेऊन हिंदूंनी संघटित होणे काळाची गरज आहे. विस्थापित काश्मिरी हिंदूंच्या पुनर्वसनासाठी आणि भविष्यात असा नरसंहार पुन्हा घडू नये, यासाठी प्रत्येकाने धर्मासाठी आणि राष्ट्रासाठी कृतीशील होणे आवश्यक आहे. हीच त्या हुतात्म्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

# सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत रजत वर्माचा नवा लुक मोहब्बतेंच्या शाहरुख खानसारखा



**नागपूर, १७ जानेवारी :** वेधक कथानकामुळे सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिका लोकप्रिय झाली आहे. या मालिकेत विराटची भूमिका करणाऱ्या रजत वर्माने अलीकडेच आपल्या लुकमध्ये लक्षणीय बदल घडवून आणला आहे, ज्यामुळे पडद्यावरील त्याच्या व्यक्तिरेखेला एक नवा कोरा आयाम मिळाला आहे. मालिकेत सुरुवातीला साध्या कॅज्यूअल्समध्ये बिनधास्त वाटणारा विराट आता नव्या लुकमध्ये अधिक परिपक्व आणि मर्दानी दिसत आहे.

विराटची व्यक्तिरेखा अनुभव आणि जबाबदाऱ्यांमधून तावून सुलाखून प्रगल्भ झाली आहे. आता विराटचे स्टाइलिंग देखील बदलले आहे. क्लीन कट, सौम्य स्वर आणि नीटनेटके कपडे यामधून त्याच्यातील परिपक्वता स्पष्ट होते. गंमत म्हणजे, विराटच्या या लुकची प्रेरणा शाहरुख खानच्या मोहब्बतें मधल्या लुकवरून मिळाली आहे. विराटचे बदललेले व्यक्तिमत्व दाखवण्यासाठी स्टाइलिंग टीमने ची या चित्रपटातील सौम्य शालीनता, मिनिमल तरीही प्रभावी, शांत पण आत्मविश्वासपूर्ण लुक विराटला देण्याचा प्रयत्न केला आहे. सौम्य कापडापासून ते फिकट रंगांच्या कपड्यांपर्यंत प्रत्येक स्टाइलिंगमधून विराट सध्या ज्या टप्प्यातून जात आहे, त्याची कल्पना येते. तो सध्या गंभीर जबाबदारी सांभाळत आहे आणि कठीण परिस्थितीला तोंड देत आहे.

त्याच्या तारुण्य-सुलभ लुक बदलून आता तो अधिक शांत आणि स्थिर दिसू लागला आहे. यामधून दिसते की विराटचा भावनिक विकास कसा झाला आहे आणि तो किती परिपक्व झाला आहे.

या नवीन लुकविषयी बोलताना रजत वर्मा म्हणतो, मी जेव्हा सुरुवातीला विराटची भूमिका करू लागलो, तेव्हा त्याच्या कपड्यांमधून हा अंदाज येत असे की, त्यावेळी तो कशा स्वभावाचा तरुण असेल-स्वच्छंद, काहीसा उतावळा आणि त्या क्षणात जगणारा. जसजशी ही व्यक्तिरेखा मोठी होत गेली आणि कथानक पुढे सरकले, त्यांचे स्टाइलिंगही स्वाभाविकपणे त्याच्या स्वभावानुसार अधिक सफाईदार आणि परिपक्व झाले आहे. टीमने जेव्हा या परिवर्तनाविषयी चर्चा केली, तेव्हा माझ्या डोळ्यासमोर पहिल्यांदा आला तो मोहब्बतेंमधला शाहरुख खानचा लुक. या नवीन स्टाइलिंगमुळे लुकमध्ये एक विशिष्ट गांभीर्य आले. या लुकमुळे मला विराटची ही बदललेली, अधिक प्रगल्भ बाजू दाखवायला मदत झाली. त्याच्या या स्वभावाचा शोध घेताना मला आनंद मिळाला. आणि मला वाटते की, प्रेक्षकांनाही विराटमधले हे परिवर्तन जाणवेल.

# रियलमी ने रियलमी १६ प्रो सिरीजचे केले अनावरण



**नागपूर, १७ जानेवारी :** भारतीय युवकांमध्ये सर्वाधिक लोकप्रिय स्मार्टफोन ब्रँड असलेल्या रियलमीने आज अत्यंत प्रतीक्षित रियलमी १६ प्रो सिरीजचे अनावरण केले. यामुळे या सिरीजची प्रीमियम मिड-रेंज सेगमेंटमध्ये बेंचमार्क म्हणून असलेली स्थिती अधिक भक्कम झाली आहे. फ्लॅगशिप-टियररियलमी १६प्रो प्लस आणि अॅक्सेसिबल ऑल-राउंडर रियलमी १६ प्रो यांच्या नेतृत्वाखालील ही सिरीज परफॉर्मन्स आणि डिझाइनमध्ये उत्कृष्टतेचा दर्जा वाढवत असून पोर्ट्रेट इमेजिंगच्या स्टॅन्डर्ड्सना नव्याने परिभाषित करण्यावर अभूतपूर्व लक्ष केंद्रित करते.

रियलमी १६ प्लस प्रो+मध्ये इंडस्ट्रीतील पहिले बायो-बेस्ड ऑरगॅनिक सिलिकॉन बॅक कव्हर देण्यात आले आहे, हे एक युएसडीए-सर्टिफाइड इको-फ्रेंडली मटेरियल असून ते सॉफ्ट आणि रेसिलियंट टेक्स्चर ऑफर करते. त्याचा रिफाइन्ड व्हीट-ग्रेन पॅटर्न बोटांना गव्हाच्या शेतातून फिरवल्यासारखी अनुभूती देतो. सोबतच, त्याची ऑल-नेचर कर्व्ह डिझाईन ही बॅक पॅनलपासून डिस्प्लेपर्यंत सीमलेस आणि कम्फर्टेबल ग्रिप सुनिश्चित करते.

रंगांचे पर्यायही तितकेच वेगवेगळे आहेत. रियलमी १६ प्रो प्लस हा मास्टर-क्युरेटेडमास्टर गोल्ड, मास्टर ग्रे आणि कॅमेलिया पिंक हा एक फ्रेश शेड फक्त भारतात उपलब्ध आहे. २०० एमपी लुमा कलर पोर्ट्रेट कॅमेरा, ३.५ एक्स पेरिस्कोप टेलिफोटो लेन्स, स्नॅपड्रॅगन ७ जेन ४ चिपसेट, ७००० एमएएच टायटन बॅटरी आणि अर्बन वाइल्ड डिझाइन असलेला रियलमी १६ प्रो प्लस हा नाओतो फुकासावा यांच्या सहकार्याने तयार करण्यात आला आहे. हा फोन ८ जीबी + १२८ जीबी, ८ जीबी + २५६ जीबी आणि १२ जीबी + २५६ जीबी या व्हेरिएंट्समध्ये उपलब्ध असून त्याची किंमत ३५,९९९*पासून सुरू होते.

रियलमी १६ प्रो हाही सारख्याच डिझाइन फिलॉसफीचा अवलंब करत उत्कृष्ट व्हॅल्यू प्रदान करतो. हा फोन कोलॅबोरेशनचा सिग्नेचर शेड असलेल्या मास्टर गोल्डमध्ये उपलब्ध असून तो स्किन-फ्रेंडली टॅक्टाइल अनुभव देतो. याशिवाय, नदीतील गोट्यांच्या स्मूथ टेक्सचरपासून प्रेरित पेबल ग्रे आणि शांतता व सौंदर्याचा प्रतीक असलेला ऑर्किड पर्पल हे रंगही उपलब्ध आहेत. इंडस्ट्री-लीडिंग व्हेल्वेट मॅट फिनिश हे सहज आणि सॉफ्ट स्पर्श देते आणि ते रंगहीनतेला प्रतिरोधक आहे, तर त्याची स्लीम, लाइटवेट बॉडी सहज कम्फर्ट प्रदान करते. २००एमपी लुमा कलर पोर्ट्रेट कॅमेरा, मीडियाटेक डायमेन्सिटी ७३००-मॅक्स ५जी चिपसेट, ७००० एमएएच टायटन बॅटरी आणि प्रीमियम अर्बन वाइल्ड डिझाइन असलेला रियलमी १६ प्रो हा ८ जीबी + १२८ जीबी, ८ जीबी + २५६ जीबी आणि १२जीबी + २५६ जीबी या व्हेरिएंट्समध्ये उपलब्ध असून त्याची किंमत २८,९९९* पासून सुरू होते.

रियलमी बड्स एअर ८ मध्ये ५५ डीबी रिअल-टाइमएएनसी, एआय इअर कॅनल अडॅप्टिव्ह एएनसी, ड्युअल-ड्रायव्हर अॅकूस्टिक्स आणि गुगल जेमिनीवर आधारित एआय व्हॉइस असिस्टंट उपलब्ध आहे. याची किंमत ३,७९९ असून लाँच ऑफरमध्ये विशेष किंमत ३,५९९* इतकी आहे.

रियलमी पॅड३ मध्ये २.८ के बुक-व्ह्यू डिस्प्ले, एआय पावर्ड प्रॉडक्टिव्हिटी टूल्स आणि ६.६ एमएम अल्ट्रा-स्लिम डिझाइनची १२,२०० एमएएच स्लिम टायटन बॅटरी आहे. हा टॅबलेट वायफाय आणि ५जी व्हेरिएंट्समध्ये उपलब्ध असून याची किंमत २४,९९९* पासून सुरू होते.

रियलमी स्मार्ट पेन २,९९९ च्या किमतीत उपलब्ध होईल, जो रियलमी पॅड ३ सोबत वापरल्यास सीमलेस नोट-टेकिंग आणि प्रॉडक्टिव्हिटीचा अनुभव प्रदान करतो.

## विद्यापीठात ३१ जानेवारी रोजी प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे आयोजन

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील इंक्यूबेशन सेंटर व इंडियन ओपन सोर्स कम्युनिटी, गुगल फॉर डेव्हलपर्स यांच्या संयुक्त विद्यमाने जनरेटिव्ह आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर दि. ३१ जानेवारी, २०२६ रोजी एक दिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांतील प्राध्यापकांना जनरेटिव्ह एआयशी संबंधित अत्याधुनिक साधने आणि त्यांचे प्रत्यक्ष उपयोग यांची माहिती व्हावी व ते सक्षम व्हावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमात गुगल डेव्हलपर्सची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार असून गुगल एआय स्टुडिओ, व्हर्टेक्स एआय, एआय व्हीजन, जेमिनी कोड असिस्ट, एडीके, एमसीपी, वाईब कोडिंग यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सत्र व हँड्स ऑन वर मार्गदर्शन करणार आहेत. या उपक्रमामुळे प्राध्यापकांच्या अध्यापन, संशोधन व नवोपक्रम क्षमतेत वाढ होण्यास मदत होणार असून शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात एआय आधारित तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करता येईल. या भविष्याभिमुख उपक्रमात विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांतील प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन इंक्यूबेशन सेंटरच्या संचालक प्रा. स्वाती शेरेकर, सीईओ. श्री आनंद यादव, बीआयएम श्री अमोल हिरुळकर यांनी केले आहे.

## पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बास्केटबॉल (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

**अमरावती :** भूपाल नोब्लेस युनिव्हर्सिटी, उदयपूर येथे ०३ ते ०६ फेब्रुवारी, २०२६ दरम्यान होणा-यापश्चिम विभाग आंतर विद्यापीठ बास्केटबॉल (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे.

चमूमध्ये डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा युवराज सिंह, रोमित उरम, अजिंक्य नवाथे, इशान भट्टड, धीरज चव्हाण व प्रज्वल पिडेकर, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा प्रथमेश घरडे, जी.एस. टोम्पे महाविद्यालय, चांदुरबाजारचा प्रज्वल लकडे व सुमित चव्हाण, एस.के.एन.गोयनका महाविद्यालय, कारंजा लाडचा साहील चौधरी व रिजवान चौधरी, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचा कृष्णा वानखडे, नेहरू महाविद्यालय, नेर परसोपंतचा महेश लाखे, तक्षशिला महाविद्यालय, अमरावतीचा अंकुश चिमोटे, विनायक विद्यामंदिर, अमरावतीचा राहुल जाधव आणि सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी, अमरावतीचा आदित्य भोरल याचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व संघाच्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरुडॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथे २२ ते ३१ जानेवारी, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

## राशीभविष्य

**मेष :** आज, तुमच्या मदतीने एखाद्याचे काम पूर्ण होईल. तुम्ही नवीन संधींच्या शोधात बाहेर पडाल, जिथे तुम्हाला अनेक अद्भुत संधी मिळतील. तुमच्या सासरच्या लोकांकडून तुम्हाला चांगली बातमी मिळेल.

**वृषभ :** आज, तुमच्या व्यावसायिक संबंधांमुळे तुम्हाला खूप फायदा होईल. तुम्ही नवीन काम सुरू करू शकता. आज तुमचे वैवाहिक जीवन आनंदी असेल आणि चांगली बातमी मिळेल.

**मिथुन :** आज तुमचा आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका ; तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. तसेच, मालमत्तेचे प्रकरण मिटविण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. आज, तुमचे मन अध्यात्माकडे वळेल.

**कर्क :** आणि तुम्ही उर्जेने परिपूर्ण असाल. आज, तुम्ही काळाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न कराल, जे तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. आज तुम्हाला एक मोठा स्टेज शो करण्याची सुवर्णसंधी मिळेल.

**सिंह :** घरातील वातावरण सुधारेल. आज, कोणतीही वस्तू खरेदी करताना त्याबद्दल संपूर्ण माहिती मिळवा. अनावश्यक बोलणे टाळण्याचा प्रयत्न करा आणि अनावधानाने सल्ला देणे टाळा.

**कन्या :** आज तुम्हाला ऑफिसच्या कामात सहकाजयांची मदत मिळेल, ज्यामुळे काम वेळेवर पूर्ण होईल. आज तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत खरेदीला जाऊ शकता. मानसिक शांती मिळेल.

**तुळ :** तुम्ही मित्रांसोबत बाहेर जाण्याची योजना आखू शकता. तुम्ही कोणाला उधार दिलेले पैसे तुम्हाला परत मिळतील. आज, विचार न करता कोणत्याही गोष्टीवर प्रतिक्रिया देऊ नका. त्यामुळे नातेसंबंध बिघडू शकतात.

**वृश्चिक :** आर्थिक बाबींबाबत तुमचा दिवस चांगला राहील. तुमची ओळखीची व्यक्ती तुम्हाला भेटू शकेल, ज्यामुळे आनंद होईल. एखाद्यावर विश्वास ठेवून निर्णय घेताना १० वेळा विचार करा.


**धनु :** मनासारखं काम मिळाल्याने खुश व्हाल. एखाद्या धार्मिक, सामाजिक कार्यक्रमात सहभागी होण्याची संधि मिळले. रविवारचा, सुट्टीचा दिवस निवांत मनासारखा जाईल. घरच्यांचा सपोर्ट मिळेल.

**मकर :** आज काही चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे. योग्य व्यवस्था करूनही, काही चिंता कायम राहतील, म्हणून तुमचे मनोबल मजबूत ठेवा. उत्पन्नासोबतच खर्चही आज वाढेल.

**कुंभ :** आज, मोठ्या माणसांच्या सहवासात वेळ घालवाल. सुखसोयींशी संबंधित वस्तू देखील खरेदी कराल. एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीला भेटल्याने मौल्यवान माहिती मिळेल. मुलांकडून चांगली बातमी मिळेल.

**मीन :** जर एखादं प्रलंबित सरकारी प्रकरण असेल, तर निर्णय तुमच्या बाजूने येण्याची शक्यता आहे. तुमच्या कौटुंबिक जबाबदाजया चांगल्या प्रकारे पार पाडू शकाल. मुलांच्या आनंदामुळे तुमच्याही चेहजयावर हसू फुलेल.

## शब्दकोडे क्रमांक २३२९




**आडवे शब्द :-**
१) देवस्थान
५) हक्क, दावा सांगणारा
८) सततचा नकार
११) पत्थर
१३) मुख्य, पुढारी
१४) यथाशास्त्र
१५) प्रमाणपत्र
१७) रजनीनाथ
१९) व्यायाम
२१) बागवान
२२) वेळ घालविणे
२५) सतत पिरपीर करणारा, रडणारा
२६) पायाला भेगा पडण्याचा आजार
२८) च्या शिवाय
३०) अथवा
३१) इन्शुअरन्स (म)
३२) कापसाची बी
३३) किंचित कडू चव
३६)आंबट गोडा चवीचे काटेरी फळ
३८) गाय
३९) मातीचा कण
४१) घरोघर
४३) रस्ता
४४) राजाची मुख्य राणी
४६) नोकरी
४७) मऊ
४९) बस्तान
५०) तक्रार, बोभाटा
५१) करंजी, मोदक यामधील पदार्थ
५२) आसाम मधील पेय पीक
५४) खोडण्याचे साधन
५५) झाडाला आलेली नवीन पाने
५७) वाट पाहणे
५९) सत्त्यातले, अगदी खरे
६१) रविवार
६३) होडी
६४) बारीक दगड
६५) पाठविलेला
६६) सहा (सं.).

**उभे शब्द :-**
१) पत्ता नसणे
२)सोनचाफा
३) स्वयंपाकी
४) दूर करणारा
५) खवाळ
६) नवरा
७)अंगातील मस्ती
९)अधम कृत्य
१०) खोकल्याची उबळ
१२) कोवळी फांदी
१६) धोकादायक
१८) पैसे
२०)नेहमी
२१) केशवृद्धीची सुगंधी वनस्पती
२३) यज्ञकर्म करणारा, मालक, पती
२४) सुगंध
२७) स्तुती
२९) वितरण
३१)विनंती
३४) कोलकाताचे विमानतळ
३५) लाज
३७) सद्वर्तन
४०)आगबोट
४२) रोख रक्कम
४३) प्रेत जाळण्याची चिता
४५)श्रीरामाचे स्तोत्र
४७) तानाजी सारखा शूर पुरुष
४८) भगवतगीता ज्यात लिहिली त्या ग्रंथाचे नाव
५०) चरा
५१) टरफल
५३) आता, सध्याच्या काळी
५५)कबुतर
५६) खांदा, खांद्याचा सांधा
५८) बाण
६०) कोळशाचा चुरा
६२) जहर.

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# भक्तिमार्ग

## स्वामीजींचं विचारधन

**स्वमदत**

स्वामी विवेकानंदांनी तरुणांना मार्गदर्शन केलं. त्यांना जीवनाचा योग्य मार्ग दाखवला. स्वामीजींचे उपदेश, विचार आजच्या काळातही लागू पडतात. यामुळे अनेकांचा दृष्टीकोन बदलू शकतो. माणूस म्हणून तुम्ही घडू शकता. त्यांचे हे पाच उपदेश तुम्हालाही नवी दिशा दाखवतील. जगण्याची नवी प्रेरणा देतील. ते म्हणतात...

* जोवर तुम्ही स्वत:वर विश्वास ठेवत नाही तोपर्यंत देवावरही विश्वास ठेऊ शकत नाही.

* विचारांनुसार माणूस घडत जातो. आपल्या मनात येणाऱ्या विचारांवरच आपलं व्यक्तिमत्त्व अवलंबून असतं. त्यामुळे आपल्या विचारांकडे कायम लक्ष ठेवा. मनात चुकीचे विचार येणार नाहीत याची काळजी घ्या.

* ज्या क्षणी आयुष्यात अडथळे, अडचणी येणार नाहीत तेव्हा समजावं की आपण चुकीच्या मार्गाने चाललो आहोत.

* तुम्ही स्वत:ला जे समजता तसेच घडता. तुम्ही स्वत:ला कमकुवत समजत असाल तर तसेच राहता आणि सक्षम, बलवान समजत असाल तर तसे घडता.

* एका वेळी एकच काम करा. एकाच उद्दीष्टावर लक्ष केंद्रित करा. आपली सर्व ताकद, क्षमता ते काम करण्यासाठी वापरा. बाकी सगळं विसरून जा. तुम्हाला नक्की यश मिळेल.



## जे त्रैलोक्याहून वेगळे

**दासबोधातून...**

जे त्रैलोक्यी नाही दान।
ते करिती संत सज्जन।
तया संतांचे महिमान।
काय ह्मणौनि वर्णावि। जे त्रैलोक्याहून वेगळे। जे वेदश्रुतीसी नाकळे। तेचि जयांचेनि वोळे। परब्रह्म अंतरी। ऐसा संतांची महिमा। बोलिजे तितकी उणी उपमा। जयांचेनि मुख्य परमत्त्मा। प्रगट होये।

आत्मप्रचिती ही पाताळ, पृथ्वी आणि स्वर्ग या तीनही लोकांमध्ये सर्वश्रेष्ठ आहे आणि ती संतांच्या सहवासाने त्याचप्रमाणे त्यांच्या कृपेनेच प्राप्त होऊ शकते असं समर्थ रामदास सांगतात. अशा या संतांचा महिमा कोणत्या शब्दांमध्ये आणि कसा वर्णन करावा याचं कोडं समर्थांनाही पडलं आहे. स्वत: परमेश्वरही परमेश्वरप्राप्ती करुन देऊ शकत नाही. ती केवळ संतच करुन देऊ शकतात. श्रीसमर्थ पुढे म्हणतात, ऐहिक संपत्ती टिकत नाही मात्र ज्ञानप्राप्ती सदैव टिकते. ही संपत्ती प्राप्त करणारे संत खरेखुरे श्रीमंत असतात. ते हे आत्मज्ञान आपल्या भक्तांना देऊन त्यांनाही श्रीमंत करत असतात. अगदी चक्रवर्ती राजे-महाराजेसुद्धा या अलौकिक श्रीमंतीचं दान देण्यास असमर्थ असतात. परंतु हे आत्मज्ञान परमेश्वरी कृपाप्रसादाने संतमहात्मे सहज देऊ शकतात.

ज्या परब्रह्माला वेद, श्रुती आणि स्मृतीही जाणू शकत नाहीत आणि जे त्रैलोक्यात आगळंवेगळं आहे ते साधुसंतांच्या कृपेनेच भक्तांना प्राप्त होऊन अंतरात स्थिरावू शकतं. त्यांच्या कृपेमुळेच मायामोहाच्या बंधनातून मुक्त होता येतं. संतसहवासाने माया आटून मनात राम प्रीती दाटून येते असंही समर्थ सांगतात. ब्रह्मानंद प्राप्त होऊन ठायी ठायी असणाऱ्या परमात्म स्वरुपाचा प्रत्यय येतो. गंगा सिंधू नदीला मिळाली की सिंधुरुप होते त्याप्रमाणे संतांच्या आशीर्वादाने रामाची भक्ती करता करता भक्त स्वत:च रामरुप होऊन जातो असं समर्थ सांगतात.



**सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि आर्थिक जीवन आणि निसर्ग यांची सुयोग्य सांगड घालणारा कालचक्रातील अकरावा महिना म्हणजे माघ. आजच्या बदलत्या जीवनपद्धतीत या महिन्यात सांगितलेल्या सर्व व्रतवैकल्यांचं पालन करणं शक्य नसलं तरी काही प्रथा अजूनही श्रद्धेने पाळल्या जातात. महत्त्वाचं म्हणजे याचे सकारात्मक परिणाम बघायला मिळतात.**

## संधीकाल हा वर्षाचा...

**विशेष लेख**

थंडीचा ऐन बहर असताना अवतरणारा महिना म्हणजे माघ. आकाशात मघा नक्षत्र असल्यामुळे या महिन्याला माघ हे नाव पडलं. या महिन्याला तप या नावानेही ओळखलं जातं. या काळात कुंदाची पांढरीशुभ्र फुले विपुल फुलतात. म्हणूनच या सुगंधी फुलांनी शंकराची पूजा करण्याची प्रथा दिसून येते. माघ शुद्ध चतुर्थीला तिलचतुर्थी म्हणतात. या महिन्यात नक्तव्रत करून धुंडीराजाची पूजा विहीत आहे. उमा चतुर्थी हे हिचे दुसरे नाव. या दिवशी कुंदफुलांनी गौरीची पूजा करतात. तीळ आणि गुळाचा नैवेद्य दाखवतात. सुवासिनी, ब्राह्मण, गाय यांची पूजा करतात. माघ शुद्ध पंचमी म्हणजे वसंतपंचमी किंवा श्रीपंचमी! या दिवशी श्रीशंकराला आंब्याचा मोहोर वाहून पूजा करण्याचीही प्रथा आहे. माघ शुद्ध सप्तमी हाही महत्त्वाचा दिवस. याचंच नाव रथसप्तमी. या दिवशी सूर्याची पूजा करून त्याला पायसाचा म्हणजे दुधाच्या खिरीचा नैवेद्य दाखवतात. बाहेर उघड्यावर चूल पेटवून ही खीर रांधली जाते. दूध उतू घालवून सूर्यदेवाला, अग्नीला नैवेद्य दाखवतात आणि आनंदसोहळा साजरा करतात. संक्रांतीपासून सुरू झालेले हळदीकुंकू समारंभ रथसप्तमीला संपतात. या दिवशी एकमेकांना तिळगूळ देण्याच्या गोड प्रथेची सांगता होते. या संपूर्ण पर्वकाळात तिळगूळ समारंभ, लहानग्यांचं बोरनहाण, हलव्याचे दागिने घालून नवीन सुनेचं अथवा जावयाचं कौतुक करणं या सगळ्याची रेलचेल सुरू असते. घरोघरी समारंभ साजरे होत असतात. खडीची चंद्रकळा नेसलेल्या नवविवाहिता घरोघरी वाण देत असतात. यशाशक्ती वाण देऊन, दान करुन पुण्यप्राप्तीचा हेतू साधत असतात. रथसप्तमीला या व्रताची सांगता होते. दारात सूर्यरथ रेखून, त्याची पूजा करुन आदित्य उपासना केली जाते. यानिमित्त ठिकठिकाणी सूर्यनमस्कार घालण्याचे उपक्रम आयोजित होतात. लोक मोठ्या संख्येने एकत्र येऊन रवीतेजाला नमन करत सूर्यनमस्कार घालतात आणि ऊर्जावान होऊन कार्यसिद्धीच्या दिशेने वाटचाल सुरू करतात.

माघ अष्टमी ही भीष्माष्टमी सार्वत्रिक स्वरूपात साजरी होत नाही. पण भीष्ममहर्षींच्या नावे या दिवशी श्राद्ध करणारी माणसं आहेत. उत्तरायण सुरू झाल्यावर कुरुक्षेत्रावर शरपंजरी असणाऱ्या भीष्मांनी माघ अष्टमी या तिथीला इच्छामरण स्वीकारलं. त्यांचं श्राद्ध करून या महाभारतकालीन घटनेची स्मृती जागवली जाते. द्वादशीला श्री विष्णूची पूजा केली जाते. तिलस्थान, तिलदान, तिलभक्षण, तिळाचा नैवेद्य, तिळाच्या तेलाचा दिवा, तिलहोम अशी स्निग्धतेची गरज पुरवणारी धर्मकृत्ये केली जातात. आपल्या पूर्वजांनी धर्म आणि विज्ञानाची एवढी अपूर्व सांगड घातली आहे की त्यांच्या अभ्यासाचं कौतुक करावं तेवढं थोडं. माघ पौर्णिमेला दानाचं मोठं महत्त्व आहे. त्यात धान्य, कांबळं, तांबडं वस्त्र, अंगरखा, जोडे, पांघरुण आदींचा समावेश होतो. परोपकार आणि पुण्यप्राप्ती यांची सांगड घालून त्यांनी कालगणनेची बैठक निर्विवाद उच्च स्तरावर नेली.


माघ पौर्णिमेला माघस्नानाची समाप्ती होते. पौष पौर्णिमेपासून सुरू झालेलं पहाटस्नानाचं व्रत या दिवशी पूर्ण होतं. या व्रताच्या निमित्ताने सूर्योदयापूर्वी आकाशात नक्षत्रं दिसत असताना विहीर, तलाव, नदी, संगम, समुद्र अशा ठिकाणी स्नान करायचं असतं. रोज एकाच ठिकाणी अभ्यंग स्नान, भूमीशयन-ब्रह्मचर्य पालन असं मनाचं संयमन शिकवणारी, शरीराला बल आणि कष्ट सोसण्याची शक्ती देणारी ही व्रतं प्रतिकारशक्ती निर्माण करणारी आहेत आणि म्हणूनच खरोखरच लाखमोलाची आहेत.

दु:ख दारिद्र्यनाशाय श्रीविष्णोणायच।
प्रात: स्नान करोम्यद्य माघे
पापविनाशनम् ।।

असं म्हणत माघस्नानाची समाप्ती होते.

सूर्य श्रवण नक्षत्रात, गुरुचंद्र सिंह राशीत, शनी मेष राशीत असेल तर महामाघी ठरते. नवान्नाचा नैवेद्य दाखवून या दिवशी लक्ष्मीचं व्रत करतात.

माघ महिन्यातला आणखी एक मोठा पर्वकाल म्हणजे महाशिवरात्र! या दिवशी दिवसभर उपवास करून शंकराची पूजा करतात. यानिमित्ताने समुद्रात स्नान करण्याचं महत्त्व सांगितलं आहे. शिवरात्रीनिमित्त ठिकठिकाणी यात्रा भरतात. माघातील अमावस्येला युगादी तिथी म्हणतात. त्या दिवशी अपिंडक श्राद्ध करतात. तमिळनाडूमध्ये अश्वत्थवृक्षाची पूजा करतात. विविध प्रांतातल्या चालीरीतीत थोडेफार फरक असले तरी त्या मागची भावना, प्रेरणा एकच असते. कुंभकोणमच्या महासरोवरात गंगायमुनादी नऊ पवित्र नद्यांचं जल येतं अशी भक्तांची धारणा आहे. तिथे स्नान करून भाविक विष्णूची पूजा करतात. कालमान, ऋतुमान यांचा विचार करून ही सर्व धर्मकृत्ये सांगितली असली तरी सर्वांनाच ती यथायोग्य स्वरूपात करणं शक्य नसतं. मात्र यावरही उपाय सांगितले आहेत. संपूर्ण महिनाभर माघस्नान शक्य नसेल तर किमान तीन दिवस हे व्रत पाळावं. मकरसंक्रांत, रथसप्तमी, माघी पौर्णिमा हे ते तीन दिवस होत. तर निसर्ग आणि सामाजिक, सांस्कृतिक, शारीरिक, धार्मिक आणि आर्थिक जीवन यांची सुयोग्य सांगड घालणारा कालचक्रातील आणखी एक महिना म्हणजे माघ. आजच्या बदलत्या जीवनपद्धतीत त्यांचं पालन करणं सर्वतोपरी शक्य नाही हे खरं असलं तरी हजारो वर्षे लोटली तरी त्यातील काही प्रथा अजूनही लोक श्रद्धेने आचरतात हेदेखील खरं आहे. महत्त्वाचं म्हणजे याचे सकारात्मक परिणाम बघायला मिळतात. पण हे सगळं करत असताना विनंती एवढीच की ही सांगड केवळ उत्सवी वा जल्लोष स्वरूपाची न राहता, त्यामागचा हेतू निसर्ग आणि विज्ञान यांची सांगड घालणं, त्यांना समजून घेणं हा असायला हवा. तरच उत्साहाला आणि आनंदाला योग्य वळण लागून, धार्मिक-सांस्कृतिक हेतूंना योग्य न्याय मिळणं शक्य होईल.



## छोट्या बदलामुळे...

**आत्मबोध**

आयुष्यात अडचणींचे अनेक प्रसंग येतात. या अडचणी दूर करण्यासाठी काय करता येईल याचा विचार आपण करतो, योग्य तो मार्ग निवडतो. पण अनेकदा मन विचलित होतं. काही तरी मोठं केल्याशिवाय जीवन सुधारणार नाही, असं वाटत राहतं. असं असलं तरी प्रत्येक वेळी काही तरी मोठं करणंच गरजेचं नसतं. छोटासा बदलही बरंच काही करू शकतो. एका कथेतून हे जाणून घेऊ.

एक मुलगा भल्या पहाटे व्यायाम म्हणून धावायला जात असे. यावेळी त्याला एक वृद्ध महिला दिसे. ही महिला तलावातल्या छोट्या छोट्या कासवांची पाठ स्वच्छ करत असे. हे बघून मुलाला आश्चर्य वाटत असे. त्याने यामागचं कारण जाणून घ्यायचं ठरवलं. त्याने त्या महिलेला यामागचं कारण विचारलं. ती म्हणली, मुला या कासवांची पाठ स्वच्छ केल्याने मला समाधान मिळतं. कवचाच्या वरच्या भागात कचरा जमा झाल्याने त्यांची उष्णता निर्माण करण्याची क्षमता कमी होते. यामुळे त्यांना पोहता येत नाही तसंच कचरा साठल्याने कवचाचंही बरंच नुकसान होतं. त्यामुळे मी हे काम करते.

त्यावर तो म्हणाला की, तुमचं कार्य खूप चांगलं आहे. पण यांच्यापेक्षाही वाईट अवस्थेतली कासवं आहेत. त्यांच्यासाठी तुम्ही काही करू शकत नाही. तुमच्या एकटीच्या प्रयत्नांमुळे फार मोठं काही घडणार नाही. कासवांचा बचाव होणार नाही. मग तुम्ही हे का करता? या प्रश्नावर महिलेने स्मितहास्य केलं. ती म्हणाली की, माझ्या कार्याचा आवाका खूप कमी असला तरी यामुळे किमान एका कासवाच्या आयुष्यात तर बदल घडणार आहे. माझ्यासारखे काही लोक असं कार्य करत असतील. मग आपणही छोटं का होईना, पाऊल पुढे टाकायला हवं. हेच पाऊल पुढे खूप मोठे बदल घडवू शकतं.

## सिद्धबली हनुमान मंदिर

**तीर्थक्षेत्र**

हनुमानाला कलियुगातली देवता मानलं जातं. देशभरात हनुमानाची बरीच मंदिरं आहेत. प्रत्येक स्थानाचं वेगळं महत्त्व आहे. कोटद्वारचं सिद्धबली हनुमान मंदिरही अशाच काही वैशिष्ट्यपूर्ण मंदिरांपैकी एक. या मंदिरात येणारा भक्त रिकाम्या हाताने परत जात नाही, असं मानलं जातं. नवस पूर्ण झाल्यानंतर भक्तमंडळी मंदिरात भंडाऱ्याचं आयोजन करतात. सिद्धबली हनुमान मंदिर उत्तराखंडमधल्या पौडी भागातल्या कोटद्वारमध्ये वसलं आहे. पौडीचं प्रवेशद्वार म्हणूनही हे स्थान ओळखलं जातं. इथल्या एका टेकडीवर हनुमानाचं मंदिर आहे. ही टेकडी खोह नदीच्या किनारी आहे. हे स्थान गढवाल जिल्ह्यात येतं. या मंदिराबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. ती अशी की, बऱ्याच वर्षांपूर्वी एक साधू या ठिकाणी हनुमानाची पूजा करत असे. हनुमानाने त्याला दिव्य सिद्धीचा वर दिला. त्यामुळे हा साधू सिद्धबली बाबा म्हणून ओळखला जाऊ लागला. या साधूने हनुमानाच्या मूर्तीची स्थापना केल्याने मंदिर त्याच्या नावाने ओळखलं जाऊ लागलं.

सुरूवातीला हे मंदिर खूप मोठं नव्हतं. पण भक्तांच्या सहकार्याने त्याचा जीर्णोद्धार करण्यात आला. इथला भंडारा परिसरात खूप प्रसिद्ध आहे. विशेष म्हणजे २०२५ पर्यंत भंडाऱ्याची नोंदणी पूर्ण झाली आहे.



## पूर्ण होतील मनोकामना

**धर्मग्रंथांमधून...**

भगवान शंकराची पूजा लिंगरूपात केली जाते. विविध मंदिरांमध्ये शिवशंकर लिंगरूपात विराजमान आहेत. शंकराची मूर्ती असलेली फार कमी मंदिरं आहेत. शंकराच्या लिंगरूपाचं वेगळं महत्त्व असलं तरी त्याच्या मूर्तीची पूजाही लाभदायी ठरू शकते. श्रीलिंग महापुराणात याबाबत उल्लेख आढळतो. भगवान शंकराच्या विविध रूपांची पूजा आणि त्याचे लाभ यात सांगण्यात आले आहेत. त्याविषयी...



* शंकर-पार्वतीसोबत कार्तिकेय असलेल्या मूर्तीच्या किंवा छायाचित्राच्या पूजनाने धनलाभ होतो. तसंच घरात सुख-समृद्धी नांदते.

* एक पाय, चार हात आणि तीन डोळे तसंच हातात त्रिशूळ अशा रूपातला शंकर. त्याच्या उत्तरेकडे भगवान विष्णू तर दक्षिणेकडे ब्रह्मदेव अशा छायाचित्राचं किंवा मूर्तीचं पूजन केलं तर भक्ताचं आरोग्य उत्तम राहू शकतं. * तीन पाय, सात हात आणि दोन डोकी असलेल्या शिवाच्या मूर्तीच्या पूजनाने भक्ताला अन्नधान्याची कमतरता जाणवत नाही. बैलावर बसलेले शंकर आणि पार्वती या रूपाच्या पूजनाने अपत्यप्राप्ती होऊ शकते. * पार्वती, नंदी आणि सर्व गणांमध्ये बसलेला शंकर या रूपाच्या पूजनाने भक्तांना मान-सन्मान मिळतो. * पार्वतीसह नृत्य करणाऱ्या हजार हात असलेल्या शंकराच्या रूपाच्या पूजनाने भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात.

## संपन्नता टिकवून ठेवण्यासाठी...

**जाणून घ्या**

घरात सुख आणि संपन्नता टिकवून ठेवण्यासाठी काय करायला हवं, असा प्रश्न महाभारतात युधिष्ठिराने कृष्णाला विचारला होता. त्यावर श्रीकृष्णाने बरंच काही सांगितलं होतं. घरात काही वस्तू ठेवल्याने संपन्नता नांदू शकते, असंही त्याने सांगितलं होतं. या वस्तूंविषयी जाणून घेऊ.



* चंदनाला पवित्र मानलं जातं. त्याच्या सुगंधामुळे नकारात्मक ऊर्जा दूर होते. पूजन साहित्यातही चंदनाला स्थान द्यायला हवं. सुगंधी चंदन घरात ठेवल्याने बरेच लाभ होतात.

* वीणा हे देवी सरस्वतीचं वाद्य आहे. वीणा घरात असेल तर सरस्वतीची कृपादृष्टी राहते, बुद्धी कुशाग्र होते. कठिण प्रसंगाला सामोरं जाण्याची शक्ती मिळते.

* घरात कायम तूप असायला हवं. आहारात त्याचा समावेश करायला हवा. तुपामुळे आरोग्य उत्तम राहतं. दररोज सायंकाळी देवापाशी तुपाचा दिवा लावावा.

* घरात मध ठेवायला हवा.



वास्तूशास्त्रातही मधाचं महत्त्व विषद करण्यात आलं आहे. मधामुळे वास्तूतले सगळे दोष दूर होतात. तसंच पूजनातही मधाचा वापर करायला हवा.

* घरात स्वच्छ पाणी भरून ठेवायला हवं. घरी आलेल्या पाहुण्याला पाणी प्यायला देऊन तृप्त करायला हवं. यामुळे विविध दोष दूर होतात.

## करावं शंखाचं पूजन

**मंत्रजागर**

हिंदू धर्मात शंखाला खूप महत्त्व आहे. समुद्रमंथनातून शंखाची उत्पत्ती झाल्याचं पौराणिक ग्रंथांमध्ये नमूद करण्यात आलं आहे. पूजनादरम्यान तसंच मंगल प्रसंगी शंखाचा उपयोग केला जातो. शंखांचे अनेकविध प्रकार आहेत. त्यातला दक्षिणावर्ती शंख अत्यंत पवित्र मानला जातो. हा शंख उजव्या हातात धरून वाजवता येतो. ब्रह्मवैवर्त पुराणात या शंखाचा उल्लेख आढळतो. त्याच्या नादाने नकारात्मक शक्तींचा प्रभाव कमी होतो. आयुरारोग्याच्या प्राप्तीसाठी दक्षिणावर्ती शंखाचं पूजन केलं जातं. या शंखासमोर बसून विशिष्ट मंत्र म्हटल्याने बरेच लाभ होऊ शकतात. आर्थिक स्थिती सुधारते. अष्टसिद्धी आणि नवनिधींमध्ये शंखाला मौल्यवान निधी तसंच रत्न मानलं जातं.

दक्षिणावर्ती शंखावर गंगाजल, दूध, मध, गुळ यांचा अभिषेक करून त्याची पूजास्थानी स्थापना करावी. त्यानंतर 'ओम श्री लक्ष्मी सहोदराय नम:' या मंत्राचा जप करावा. दररोज किमान पाच वेळा हा मंत्र म्हणावा. यामुळे आर्थिक अडचणी दूर होतात. लक्ष्मीचा वास राहतो. तसंच यशाचे मार्ग मिळतात. प्रसिद्धी हवी असल्यास तुम्ही हा उपाय करू शकता. या मंत्राच्या जापाने उत्पन्नाचे काही मार्गही तुम्हाला मिळू शकतात.



दक्षिणावर्ती शंखातलं पाणी विशिष्ट स्थानी शिंपडलं तर तिथला नकारात्मक प्रभाव दूर होतो. तसंच घरात सुख आणि समृद्धीचा वास राहतो, असं मानलं जातं.

# चारित्र्यसंपन्न बलशाली हिंदू समाजाची गरज



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
हिंदू धर्म, परंपरा, संस्कृती आणि मूल्यांचे संरक्षण व संवर्धन या उद्देशाने हिंदू संमेलन समिती, गंगापूर यांच्या वतीने भव्य हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी उद्बोधन केले.

ते म्हणाले जगाला हेवा वाटेल असा चारित्र्यसंपन्न बलशाली समाज आपल्याला घडवावा लागेल. त्यासाठी आपला स्वभाव आणि आचरण तसे करावे लागेल. भारताच्या भविष्यासाठी हिंदू समाजच जबाबदार आहे. त्यासाठी हिंदू समाजाने स्वतःच्या आचरणातून समाज परिवर्तन घडवून आणण्याचे आवाहन त्यांनी केले.

संमेलनास ह.भ.प. गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज (श्री क्षेत्र देवगड संस्थान), ह.भ.प. गुरुवर्य महंत रामगिरीजी महाराज (मठाधिपती, गोवर्धन धाम, श्री क्षेत्र सरलाबेट), जगद्गुरु श्री श्री १००८ स्वामी शांतिगिरीजी महाराज (जगद्गुरु श्री जनार्दन स्वामी आश्रम, श्री क्षेत्र वेरूळ) यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक सुनील छत्रे यांनी केले.

कार्यक्रमात उपस्थित संतांनी आशिर्वचन करताना समाजाला समरसता व कुटुंब प्रबोधनासाठी मार्गदर्शन केले. भास्करगिरीजी महाराजांनी संघाने मान अपमान सहन करत शंभर वर्षाचा प्रवास केला आहे. जातीपातीत विभागलेल्या हिंदू समाजाचे त्यांनी संघटन केलं. आता हिंदू समाजाने सामाजिक एकोपा ठेवून वाटचाल करावी असे आवाहन केले. रामगिरीजी महाराजांनी बांग्लादेशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराकडे लक्ष वेधले. ते म्हणाले आपल्याला संघटित रहावे लागेल. आपल्या समाजातील जातीवादाचे समूळ उच्चाटन करावे लागेल. शांतीगिरीजी महाराजांनी संस्कृतीचे आचरण करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

## शोध प्रबंध, पेटंट आणि स्टार्टअप मधून

# नॉलेज इकॉनॉमीचे वर्तुळ पूर्ण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
समाजातील संशोधक, वैज्ञानिक शोध प्रबंध आणि पेटंटच्या माध्यमातून त्या त्या देशाच्या औद्योगिकतेला चालना देऊन आर्थिक पाया मजबूत करीत असतात. कोणत्याही देशाची आर्थिक सुबत्ता हे त्याच्याजवळ किती डाटा आहे यावरून दिसून येते. शोध प्रबंध, पेटंट आणि स्टार्टअप च्या माध्यमातून नॉलेज इकॉनोमीचे वर्तुळ पूर्ण होत असल्यामुळे या बाबींकडे शासनाने लक्ष पुरविणे गरजेचे आहे असे प्रतिपादन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे कुलगुरू विजय माहेश्वरी यांनी केले.

अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जगातील निवड केलेल्या दोन टक्के शास्त्रज्ञांमध्ये समाविष्ट झालेले डॉक्टर कमलकिशोर मणियार यांचा सपत्नीक सत्कार समारोहाचा कार्यक्रम विजय माहेश्वरी यांच्या हस्ते विदर्भ गौरव प्रतिष्ठान व माहेश्वरी पंचायत सिताबर्डी नागपूर यांच्यावतीने बाबुराव धनवटे सभागृह येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून राज्य माहिती आयुक्त गजानन निमदेव तर संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावतीचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, रातुमहाराज विद्यापीठाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय ढोबळे अतिथी म्हणून



उपस्थित होते. यावेळी डॉ.गिरीश गांधी तसेच अ. भा. माहेश्वरी समाजाचे श्याम सोनी यांची विशेष उपस्थिती होती.

डॉ. विजय माहेश्वरी आपल्या भाषणामध्ये पुढे म्हणाले की जगामध्ये भारतातील उच्च शिक्षण व्यवस्था ही जगातील तिसरी उच्च शिक्षण व्यवस्था असून ११०० पेक्षा जास्त विश्व महाविद्यालय व पन्नास हजार पेक्षा अधिक महाविद्यालय आहेत. असे असून सुद्धा सादर होणारे शोध प्रबंध हे संख्येच्या तुलनेत जगात चौथ्या क्रमांकावर आहे तर गुणवत्तेच्या प्रमाणात ते जगात पहिल्या दहा मध्येही येत नाही. भारतामध्ये ९० हजारच्या घरात पेटंट सादर केले जातात त्या तुलनेत अमेरिका दरवर्षी १७ लाख पेटंट सादर करते आणि चायना तर ४० लाख पेटंट देतो.

तेव्हा आपल्या देशात जो डाटा उपलब्ध आहे आणि त्यातून जे शोध प्रबंध व पेटंट दिले जातात त्याला शासन, महाविद्यालयाकडून पाठबळ मिळणे आवश्यक आहे. हे जर मिळाले तरच निर्माण होणारे स्टार्टअप हे देशाला आर्थिक सुबत्ता देऊ शकतात. असे

डॉ.मिलिंद बाराहाते म्हणाले की, डॉक्टर किंवा संशोधकांच्या कार्याची दखल घेतल्या जाणे आणि त्यांना सन्मानित करणे हे फार कमी होताना दिसते. शोध प्रबंध, संशोधन, पेटंट याच्या विकासासाठी शासनाकडून पाठबळ मिळणे आवश्यक आहे. महाविद्यालयाकडून होणारा दुराग्रह याचा यावर दुरगामी परिणाम होत आहे. परदेशामध्ये खाजगी इंडस्ट्री, सरकार आणि विद्यापीठ यांच्यामध्ये योग्य समन्वय असून नॉलेज इकॉनोमि विकसित केल्या जाते. आपल्या देशात खाजगी इंडस्ट्रीचा नॉलेज इकॉनॉमीमध्ये सुयोग्य सहसंबंध नाही याकडे शासनाने लक्ष देण्याची गरज आहे असे ते म्हणाले.

राज्य माहिती आयुक्त गजानन निमदेव अध्यक्षीय भाषणात म्हणाले की विदर्भातील संशोधक वैज्ञानिकांना पुणे मुंबईकडे थारा मिळत नाही अशी दुर्दशा असताना एका छोट्या मेहकर सारख्या गावातून शिकलेले आणि संशोधकापर्यंत मजल मारलेले डॉ. कमलकिशोर मणियार हे आज पुण्यासारख्या डी.वाय. पाटील विद्यापीठामध्ये अध्यापनाचे कार्य करत आहे ही भूषणावह गोष्ट आहे. अशा संशोधकाची दखल स्टॅन्डफोर्ड या अमेरिकन विद्यापीठाकडून घेतल्या जाते हा त्यांनी केलेल्या कार्यातील उच्चांक आहे.

विदर्भातील सांस्कृतिक दूत म्हणून ज्यांना ओळखले जाते असे डॉक्टर गिरीश गांधी यांनी त्यांचा सत्कार समारोह आयोजित करून नव्या पिढीसमोर आदर्श निर्माण केला आहे असे वक्तव्य त्यांनी केले.

डॉक्टर कमलकिशोर मणियार यांनी कार्यक्रमाचे आयोजन, आयोजक आणि कुटुंबाबद्दल भावपूर्ण कृतज्ञता सत्काराला उत्तर देताना व्यक्त केली. संचालन शुभदा फडणवीस यांनी केले तर बाळासाहेब कुलकर्णी यांनी आभार मानले. केले.

# नागपुरला प्रदूषणमुक्त शहर बनवायचे : गडकरी



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
नागपूर महापालिकेत विजय मिळाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी विजयी नगरसेवकांचे अभिनंदन करण्यासाठी एकत्र आले होते.

यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी संवाद साधला तसेच गडकरी यांनी नागपूरला सुंदर आणि प्रदूषणमुक्त शहर बनवायचे असल्याचे निर्देश नवनिर्वाचित नगरसेवकांना केले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागपूरच्या जनतेने मोठा विजय आपल्याला दिला आहे. महाराष्ट्रात एकूणच भाजपने या निवडणुकीत मोठा रेकॉर्ड केला आहे आणि २९ पैकी २५ महापालिकांमध्ये आपली सत्ता आली आहे. महाराष्ट्रातला सर्वात मोठा पक्ष भाजपच आहे हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. मी सगळ्यांचे अभिनंदन करतो. मला विश्वास आहे, येत्या काळात विकासाचा अजेंडा जो आहे, तो आपण वेगाने पुढे नेऊ.

नितीन गडकरी म्हणाले, आपल्या नागपूरमध्ये यश मिळाले आहे, आपल्या शहरात जे काही उत्तम कार्य आपण केले, त्याचा परिणाम म्हणून आपल्याला चांगले यश मिळाले आहे. आपण आश्वासन दिले आहे की प्रदूषणमुक्त शहर आपण तयार करणार आहोत. ही वचने आपल्याला पूर्ण करायचे आहे. या निवडणुकीत आपल्या कार्यकर्त्यांनी, आमदारांनी उत्तम काम केले आहे.

पुढे बोलताना नितीन गडकरी म्हणाले, नागपूर शहरात, विदर्भात आणि महाराष्ट्रात चंद्रशेखर बावनकुळे यांनी खूप काम केले आहे. त्यांनी परिश्रम करून विजय मिळवून दाखवला आहे. येणाऱ्या काळात जसा आपल्याला आनंद आहे, तशी जबाबदारी वाढली आहे. जे नगरसेवक निवडून आले आहेत, जनतेच्या ज्या अपेक्षा आहेत, जे प्रश्न आहेत, ते सोडवायचे आहेत. हा विजय आपल्या पक्षाचा नेत्रदीपक विजय आहे. आता पुन्हा एकदा आपल्याला संधी मिळाली आहे. हा विजय नम्रपणे स्वीकारायचा आहे. जनतेच्या आशा आकांक्षा पूर्ण करायच्या आहेत, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी गडकरी यांनी मोठा विजय मेळावा आयोजित करण्याचे आवाहन केले. तसेच या कार्यक्रमात संगीत आणि जेवणाची मेजवानी माझ्याकडून असेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## राणांनी शिस्तीत केला भाजपचा गेम

### यशोमती ठाकूर यांची टीका

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १७ :
अमरावती महापालिकेच्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. २५ जागा जिंकून भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. काँग्रेसच्या नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी भाजपवर खोचक टीका केली.



यशोमती ठाकूर म्हणाल्या, रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाने शिस्तीत राहून भाजपचा ह्यगेमह्व केल्याचे आम्हाला दिसले. अमरावती महापालिकेत सत्ता स्थापन करण्यासाठी भाजपला कुबड्यांची गरज पडणार आहे.

भाजप युवा स्वाभिमान पक्षासमोर लाचार होणार आहे. अमरावतीत लंगडी सत्ता स्थापन होताना आम्हाला दिसत आहे. जनतेने भाजपला कौल दिलेला नाही. हा कौल भाजपच्या विरोधातील आहे, असे त्या म्हणाल्या.

## वयाच्या २१ व्या वर्षी महापालिकेत एन्ट्री

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
नागपूर महापालिकेच्या सतरंजीपुरा झोनमधील निवडणुकीत भाजपच्या लक्ष्मी हत्तीठेले यांनी मिळवलेला विजय केवळ पक्षासाठी नाही, तर नागपूरच्या राजकीय इतिहासासाठीही लक्षवेधी ठरला.



अवघ्या २१ वर्षे दोन महिने वयाच्या लक्ष्मी हत्तीठेले नागपूर महापालिकेतील सर्वात कमी वयाच्या नगरसेविका ठरल्या आहेत. मी माझ्या मतदारांची, विशेषतः जनरेशन झेनच्या तरुणांची आभारी आहे, ज्यांनी वेळ काढून मला मतदान केले. मी माझ्या क्षमतेनुसार सर्वोत्तम काम करेन आणि पक्ष तसेच मतदारांच्या अपेक्षा पूर्ण करेन, असे आश्वासन त्यांनी निवडून आल्यानंतर दिले.

नागपूर महापालिका निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक पाच मधून लक्ष्मी हत्तीठेले विकासाचा नवीन संकल्प घेऊन जनतेसमोर आल्या. मूलभूत सुविधा, स्वच्छता, रस्ते, पाणीपुरवठा आणि सर्वसमावेशक विकासासाठी कटिबद्ध नेतृत्व म्हणून लक्ष्मी हत्तीठेले यांना निवडून देण्यात आले. २१ वर्षे दोन महिने वयाच्या लक्ष्मी हत्तीठेले शुक्रवारी नागपूर महापालिकेच्या सर्वात तरुण नगरसेविका बनल्या. प्रभाग ५-अ मधून भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवणाऱ्या आणि बी.ए. मानसशास्त्रच्या पाचव्या सत्रात शिकणाऱ्या लक्ष्मीने पुनरागमन करत विजय मिळवला.

बहुतेक फेऱ्यांमध्ये पिछाडीवर राहिल्यानंतर, लक्ष्मीने १३व्या फेरीत १८१ मतांची आघाडी घेत जोरदार पुनरागमन केले. मतमोजणीची प्रक्रिया एखाद्या थरारनाट्यापेक्षा कमी नव्हती. सुरुवातीच्या १२ फेऱ्यांमध्ये लक्ष्मी आपल्या प्रतिस्पर्ध्यापेक्षा पिछाडीवर होती आणि तिचा पराभव निश्चित वाटत होता. १३ व्या फेरीपासून आघाडी घेतली आणि अखेरीस १,०२४ मतांच्या फरकाने विजय मिळवला.

# मुस्लिम बहूल भागात काँग्रेसचे मताधिक्य

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्र. ८ या मुस्लिम बहूल भागात काँग्रेसचे चारही मुस्लिम उमेदवार विजयी झालेत. अनुसूचित जमाती महिला प्रवर्गातून सय्यद मुस्कान यांनी २७ हजार ७५१ मते मिळवली तर त्यांच्या प्रतिस्पर्धी भाजपच्या कृतिका योगेश गोन्नाडे यांना ८,५२३ मते पडली.

प्रभाग क्र. १८ (ब) मध्ये अंसारी सिराज अहमद यांना २०,८६८ मते मिळाली, तर प्रभाग क्र.१८ (क) सर्वसाधारण महिला गटातून अंसारी सय्यदा बेगम यांनी १६ हजार ६३० मते मिळवली. याच प्रभागात ड गटातून वसीम खान याने २०,०९८ मते मिळवली. विशेष म्हणजे, मध्य नागपूरचे सलग तीन वेळा भाजपचे आमदार राहिलेले विकास कुंभारे यांचे पुत्र श्रेयस कुंभारे यांचा ११ हजार मतांपेक्षा अधिक फरकाने दारुण पराभव केला. श्रेयस कुंभारे याला ९,९२१ मते मिळाली.

# आयकर विभागाची छापेमारी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १७ :
आयकर विभागाने उपराजधानी नागपुरात पाच ठिकाणी छापे टाकले. आयकर विभागाने पाच वेगवेगळ्या ठिकाणी सुपारी किंग व्यापाऱ्यांच्या प्रतिष्ठांनांची झडती सुरू केली. विभागाने सुपारीच्या खरेदी- विक्री संदर्भात मोठ्या प्रमाणात कागदपत्रांची झडती सुरू केली. विभागाने इतवारीतील केरळ गल्लीतील इतवारी किरणा मर्चंट असोसिएशनच्या कार्यालयाशेजारील पाच सुपारी व्यावसायिकांवर छापे टाकले.

यात सुपारी किंग म्हणून कुख्यात आसिफ कलिवाला, गनी खान, कळममनातील व्यापारी अन्ना सनई, अल्ताफ आणि राजेश चिनॉय यांच्या प्रतिष्ठानांवरही छापे टाकल्याची माहिती आहे. फुकट नगर, शांती नगर, महेश नगर, सराफा ओळी, मस्कासाथ परिसरातील सुपारी व्यावसायिकांवरही छापे टाकले.

काही दिवसांपूर्वी कर्नाटक पोलिसांनी महाराष्ट्र आणि कर्नाटक सिमेवरच्या गुलबर्गा येथे सुपारीने भरलेले पाच कंटेनर जप्त केले होते. त्यात नागपुरातील इरफान नावाच्या ट्रान्सपोर्ट व्यावसायिकाचे नाव समोर आले होते. कर्नाटकातून नारळाच्या आड सुपारी भरून निघालेले हे कंटेनर नागपुरात येणार होते. त्यामुळे आयकर विभागाने छापा सत्रात या कंटेनर कारवाईचे कनेक्शन आहे, अशी शंका येत आहे.

# जि. प. व पं. स. निवडणुका बॅलेट पेपरवर घ्या

## राज्य निवडणूक आयुक्त व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना नाना पटोलेंचे पत्र

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १७ :
राज्यात नुकत्याच झालेल्या २९ महानगरपालिका निवडणुकांनी निवडणूक व्यवस्थेचा बुरखा पुर्णतः फाटलेला आहे. शहरातील अत्यल्प मतदानाची टक्केवारी ही केवळ मतदार उदासिन नसून निवडणूक प्रक्रियेवरचा विश्वास कमी होत असल्याचे निर्दशक असल्याचे काँग्रेस आमदार नाना पटोले म्हणाले.



देशातील अनेक राज्यांनी जनतेचा विश्वास टिकवण्यासाठी तसेच वाद टाळण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एश्ट ऐवजी बॅलेट पेपरवर घेण्याचा निर्णय घेतलेला आहे. मग महाराष्ट्रातच ईव्हीएमचा हट्ट का? व कोणाच्या फायद्यासाठी? असे प्रश्न मतदार विचारात आहेत. या जनभावनेचा आदर करत जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका बॅलेट पेपरवर घ्याव्यात, अशी मागणी काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी केली आहे.

राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या पत्रात नाना पटोले पुढे म्हणाले की, मतदार यादीतील घोळ, मतदान केंद्र शोधण्यासाठी मतदारांना दोन-तीन तास करावी लागणारी वणवण, हजारो मतदारांना मतदान न करताच परत जाण्याची येणारी वेळ, या साऱ्या बाबी निवडणूक आयोगाच्या अकार्यक्षमतेचे गंभीर निदर्शक आहेत, ही परिस्थिती लोकशाहीसाठी घातक आहे. त्यामुळे जि. प. व पंचायत समित्यांच्या निवडणुका बॅलेटवर घ्याव्या, अशी मागणी त्यांनी केली आहे.



■ नागपूर : मनपा निवडणुकीत प्रभाग क्रमांक १४ मधून भाजपाचे उमेदवारी विनोद कन्हेरे यांनी १३७५ मतांनी प्रतिस्पर्ध्यावर मात केली. दैनिक महासागरचे पीआरओ कमल नारायण नामपल्लीवार यांच्यासह मित्र परिवारातील दिनेश कटारिया यांनी कन्हेरे यांचे स्वागत केले.

## लाडक्या बहिणींकडून महामार्ग जाम

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. १७ :
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांचा हप्ता वर्ग करण्यात आल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात राज्यातील अनेक लाभार्थी महिलांच्या खात्यात अजूनही हे पैसे जमा झालेले नाहीत.

या पार्श्वभूमीवर महिलांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, त्याचा थेट उद्रेक भंडारा जिल्ह्यात पाहायला मिळाला. शनिवारी सकाळी संतप्त लाडक्या बहिणींनी मुंबई-कोलकाता राष्ट्रीय महामार्ग अडवून धरला. भंडारा शहरातील नागपूर नाका परिसरात महिलांनी महामार्गावर ठिय्या आंदोलन सुरू केल्यामुळे दुतर्फा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. काही वेळातच वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आणि प्रवाशांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागला. पोलीस आणि प्रशासनाच्या आश्वासनानंतर महिलांनी त्यांचे आंदोलन मागे घेतले.

